BMA

बृहन्महाराष्ट्र मंडळ

presents



वृत्त

गणपती विशेषांक

२०२६

वृत्तचे ४६ वे वर्ष

तुमची आरास • तुमची प्रेरणा • तुमची गोष्ट

अध्यक्षीय मनोगत



॥ श्री गणेशाय नमः ॥

श्री. राहुल देशमुख

सप्टेंबर महिना आपल्या सर्वांसाठी गणेशोत्सव, संस्कृती, सेवा आणि सामूहिक सहभागाचा उत्सव ठरला. उत्तर अमेरिकेतील विविध मराठी मंडळांनी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि आपुलकीने साजरा केला. या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक मंडळाचे, स्वयंसेवकांचे, कलाकारांचे आणि कुटुंबांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

यंदाच्या गणेशोत्सव आरास उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद विशेष आनंद देणारा ठरला. २०० हून अधिक कुटुंबांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. हा केवळ एक स्पर्धात्मक उपक्रम राहिला नाही, तर उत्तर अमेरिकेतील मराठी कुटुंबांनी आपली परंपरा, कल्पकता, श्रद्धा आणि उत्सवातील आनंद एकमेकांशी वाटून घेण्याचा सुंदर सोहळा बनला. प्रत्येक आरासामागे कुटुंबाचा वेळ, मेहनत, कल्पकता आणि बाप्पावरील प्रेम दडलेले होते. आपल्या सर्वांच्या सहभागामुळे हा उपक्रम खऱ्या अर्थाने सामूहिक उत्सव ठरला.

या भरभरून मिळालेल्या प्रतिसादाबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. आपल्या प्रेमामुळे आणि सहभागामुळेच असे उपक्रम अधिक अर्थपूर्ण बनतात. या विशेषांकाच्या माध्यमातून त्या सर्व सुंदर क्षणांना पुन्हा एकदा उजाळा देताना आम्हाला आनंद होत आहे.

गणपती बाप्पा मोरया!

संपादकीय



॥ श्री गणेशाय नमः ॥

श्री. गौतम पंगू

नमस्कार मंडळी,

उत्तर अमेरिकेतील मराठी लोकांसाठी हा काळ म्हणजे उत्साहाचा काळ! उन्हाळा संपतो, हवेत गारवा जाणवू लागतो, झाडांची पानं रंग बदलतात आणि सणांची रांग लागते. काहीच दिवसांपूर्वी आपण गणपती बाप्पाला निरोप दिला आणि आता नवरात्र-दसरा दारात उभे आहेत. मात्र गणेशोत्सवाच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. त्या संपूर्ण उत्तर अमेरिकेतील मराठी समुदायाबरोबर शेअर करण्यासाठी साकारलेला हा 'बृहन्महाराष्ट्र वृत्त गणेशोत्सव विशेषांक' आपल्या हातात देताना आम्हाला आनंद होत आहे!

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला संघटित स्वरूप देऊन १३० हून अधिक वर्षे झाली. काळानुसार त्याचे स्वरूप बदलले आणि आज उत्तर अमेरिकेतही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. घराघरांत गणपती, सजावट, आरत्या आणि मोदक; तर मराठी मंडळांच्या उत्सवांत देखावे, आरास, सांस्कृतिक कार्यक्रम, ढोल-ताशा-लेझीम आणि असंख्य स्वयंसेवकांची मेहनत—या सगळ्यामुळे हा सण आपल्या समुदायाला एकत्र आणणारा आनंदसोहळा बनला आहे.

मग ही सकारात्मक ऊर्जा स्थानिक पातळीपुरतीच का मर्यादित ठेवायची? याच विचारातून राहुल देशमुख आणि ऋषिकेश रानडे यांच्या नेतृत्वाखाली 'वृत्त'ने हा विशेषांक साकारला आहे.

यात गणेशोत्सव आरास स्पर्धेतील १०० हून अधिक आरासांचे फोटो आणि त्यामागच्या कथा, तसेच विविध मंडळांच्या गणेशोत्सवातील संकल्पना, परंपरा, कार्यक्रम, खाद्यपदार्थ आणि गंमतीजमती वाचायला मिळतील. या आठवणींमधून उत्तर अमेरिकेतील आपल्या विशाल मराठी परिवाराशी जोडलं गेल्याची भावना अधिक दृढ होईल आणि पुढच्या वर्षासाठी नव्या कल्पनाही सुचतील!

विशेषांक नक्की वाचा आणि आपल्या प्रतिक्रिया, सूचना व कल्पना आम्हाला कळवा. 'वृत्त'च्या माध्यमातून असेच नवनवीन उपक्रम राबवण्याचा आमचा मानस आहे.

येऊ घातलेल्या नवरात्रोत्सवाच्या आणि दसऱ्याच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

उपक्रम प्रमुखांचे मनोगत



॥ श्री गणेशाय नमः ॥

श्री. ऋषिकेश रानडे

उत्तर अमेरिकेत आपण सगळेच गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने आणि श्रद्धेने साजरा करतो. प्रत्येक घरचा बाप्पा वेगळा, प्रत्येक आरास वेगळी आणि त्यामागची कल्पनाही तितकीच सुंदर. प्रत्येक आराशीमागे अनेक दिवसांची तयारी, मेहनत, कल्पकता आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे बाप्पावरील प्रेम असतं. या सुंदर आरासींना एक व्यासपीठ मिळावं आणि उत्तर अमेरिकेतील आपल्या मराठी बांधवांना एकमेकांच्या बाप्पाचं दर्शन घडावं, या साध्या विचारातून हा उपक्रम सुरू झाला.

हा उपक्रम सुरू करताना इतका मोठा प्रतिसाद मिळेल, अशी आम्ही कल्पनाही केली नव्हती. उत्तर अमेरिकेच्या विविध भागांतून २०० हून अधिक कुटुंबांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि या उपक्रमाला खऱ्या अर्थाने एका सामूहिक गणेशोत्सवाचे रूप दिले. इतकी विविधता, कल्पकता आणि उत्साह अनुभवणे ही आमच्यासाठीही मोठी आनंदाची गोष्ट होती. काही काळानंतर ही केवळ स्पर्धा राहिली नाही; ती आपल्या सगळ्यांचा एकत्रित उत्सव बनली.

विजेते निवडण्याची जबाबदारी अतिशय मनापासून आणि संयमाने पार पाडल्याबद्दल आमचे परीक्षक मयुरी नाईक, अमित कोरडे आणि ज्योत्स्ना कुरकुटे यांचे विशेष आभार. त्यांनी असंख्य तास देऊन प्रत्येक प्रवेशिका बारकाईने पाहिली आणि विजेत्यांची निवड करण्याच्या प्रक्रियेत मोलाची मदत केली. त्यांच्या वेळेचे, मेहनतीचे आणि निष्पक्ष योगदानाचे आम्ही मनापासून ऋणी आहोत.

तरीही, आमच्यासाठी सहभागी झालेलं प्रत्येक कुटुंब विजेतंच आहे. प्रत्येक आरासामागची भावना, मेहनत आणि बाप्पावरील प्रेम हेच या उपक्रमाचं खरं यश आहे.

हा उत्सव तुमच्यासाठी अधिक खास आणि संस्मरणीय करण्याचा आम्ही मनापासून प्रयत्न केला. या संपूर्ण प्रक्रियेत आमच्याकडून काही चूक, त्रुटी किंवा गैरसोय झाली असेल, तर कृपया मोठ्या मनाने क्षमा करावी. आम्ही नेहमीच शिकत राहू इच्छितो आणि तुमच्या अभिप्रायातून हा उपक्रम पुढे आणखी चांगला करण्याचा प्रयत्न करू.

तुमच्या भरभरून प्रतिसादामुळेच हा 'वृत्त गणेशोत्सव विशेषांक' साकार झाला. मी आणि माझी संपूर्ण टीम हा खास अंक तुमच्यापर्यंत पोहोचवताना मनापासून आनंदी आहोत.

हा उपक्रम पुढच्या वर्षीही सुरू ठेवावा असं तुम्हाला वाटतं का? तुमचा अभिप्राय आम्हाला नक्की कळवा. तुमच्या सूचनांमधूनच पुढच्या वर्षी हा उपक्रम आणखी सुंदर, सर्वसमावेशक आणि संस्मरणीय करता येईल.

तुमच्या सहभागासाठी, प्रेमासाठी आणि भरभरून प्रतिसादासाठी मनःपूर्वक धन्यवाद!

गणपती बाप्पा मोरया!

कार्यकारी मंडळ

EXECUTIVE COMMITTEE



Rahul Deshmukh
President



Narendra Kalyankar
Vice-President



Milind Kulkarni
Treasurer



Amit Korde
Secretary



Ulka Nagarkar
EC Member



Harshad Annigeri
EC Member



Sandip Pawar
EC Member



Jyotsna Kurkute
EC Member



Rushikesh Ranade
EC Member

विश्वस्त मंडळ

BOARD OF TRUSTEES



Sunil Suryavanshi



Manjusha Naik



Sandeep Dixit

BMA
बृहन्महाराष्ट्र मंडळ

वृत्त टीम

VRUTTA EDITORIAL TEAM



Rahul Deshmukh
President



Dr. Gautam Pangu
Vrutta Editor



Rushikesh Ranade
Vrutta EC Lead



Vidula Kolhatkar
Vrutta Team



Aparna Kolekar
Vrutta Team



Komal Kulkarni
Vrutta Team



Sheetal Rangnekar
Vrutta Team

आमच्याशी जोडलेले राहा!

@BMM.NorthAmerica

Instagram

Scan QR code from Mobile

WhatsApp Channel

Scan QR code from Mobile

Facebook Group

Scan QR code from Mobile

वेबसाइट · Website

Scan QR code from Mobile

१

घरगुती गणेशउत्सव

निसर्गाच्या सानिध्यात , पर्यावरण पूर्वक साहित्यातून साकारलेले बाप्पा

Prajakta Kulkarni,Cumming GA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाची आमची आरास महादेवाला समर्पित आहे. 🌸🙏
फुलांची सजावट, त्रिशूल, डमरू आणि नैसर्गिक साहित्याचा सुंदर वापर करून साधेपणात आपली संस्कृती जपण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

उत्तर अमेरिकेत राहूनही आपल्या मुलांना आपल्या संस्कृतीची, परंपरांची आणि श्रद्धेची ओळख व्हावी, तसेच कुटुंबासोबत आपल्या बालपणीच्या आठवणी पुन्हा अनुभवता याव्यात, हीच या आरासीमागची सुंदर प्रेरणा आहे. 🕉️❤️

हर हर महादेव! 🔱

Milind Naik, Bellevue, WA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाची आमची आरास निसर्गरम्य आणि पर्यावरणपूरक गुहेच्या (Cave) संकल्पनेवर आधारित आहे. या आराशीसाठी आम्ही प्रामुख्याने पुनर्वापर करता येण्याजोगे कागद (Reusable Paper) आणि कागदाचे गोळे (Paper Balls) वापरून खडकाळ गुहेचा आणि दगडांचा हुबेहूब देखावा तयार केला आहे. या नैसर्गिक देखाव्याला अधिक जिवंतपणा आणण्यासाठी हिरवी पाने, वेली आणि मातीचा दिवा वापरण्यात आला आहे. उत्तर अमेरिकेत राहूनही मुलांना निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्या गणपती बाप्पाच्या प्राचीन रूपाची ओळख व्हावी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश मिळावा, ही या आरासीमागची मुख्य प्रेरणा आहे.

Neha Dalpe, USA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाचा गणेशोत्सव माझ्यासाठी केवळ सजावट नाही, तर माझ्या मातीशी, संस्कृतीशी आणि बालपणाच्या आठवणींशी जोडला जाणारा सुंदर प्रवास आहे. परदेशी भूमीत राहूनही महाराष्ट्राशी असलेले नाते जपण्यासाठी यंदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांची प्रेरणा घेऊन हा देखावा स्वतःच्या हाताने साकारला. गडाची तटबंदी, भगवा ध्वज आणि मध्यभागी विराजमान माझा हाताने घडवलेला पर्यावरणपूरक गणराया ही या संकल्पनेची ओळख आहे. मातीला आकार देताना प्रत्येक क्षण माझ्यासाठी ध्यान, एकाग्रता आणि भक्तीची साधना असतो. या रचनेतून शिवरायांचा पराक्रम, स्वराज्याची प्रेरणा आणि मराठी संस्कृतीवरील प्रेम जपण्याचा प्रयत्न केला आहे. हजारो मैल दूर असलो तरी मनातला महाराष्ट्र आणि घरातला गणराया सदैव जवळच आहेत.

Sonali Anant Nimkarde, CT

॥ श्री गणेशाय नमः ॥



१३२ देवळ्यांचे गणेश मखर — "वारसा महाराष्ट्राचा, सोहळा गणरायाचा"
शनिवारवाड्याची प्रेरणा आणि पारंपरिक वारली कलेचा संगम साधत निमकर्डे कुटुंबाने अमेरिकेतही महाराष्ट्राच्या कला व संस्कृतीशी असलेले नाते जपले आहे.
पुण्यातील शनिवारवाड्याच्या देवळ्यांपासून प्रेरणा घेऊन निमकर्डे कुटुंबाने गणपती बाप्पासाठी मखर साकारले आहे. या सजावटीत एकूण १३२ देवळ्यांचा समावेश असून, प्रत्येक देवळीचे कापकाम, त्यावरील वारली चित्रकला आणि सजावट कुटुंबीयांनी स्वतःच्या हातांनी केली आहे. अनंत निमकर्डे, त्यांच्या पत्नी सोनाली आणि त्यांच्या मुली रीया (वय १०) व ईशा (वय ३) यांनी या निर्मितीत सहभाग घेतला.

Sunil Deshpande, Atlanta, Georgia


॥ श्री गणेशाय नमः ॥



"श्रींचं अंगण – देशपांडे वाडा" ही केवळ गणपतीची आरास नाही, तर हजारो मैल दूर अटलांटात आपल्या आठवणीतला जुना मराठी वाडा, त्यातली माणसं आणि जगणं पुन्हा जिवंत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिनाभर कुटुंबाने मिळून केवळ कागद आणि कार्डशीट वापरून, प्रत्येक खांब, कमान, कौलारू छप्पर, दारं-खिडक्या व कठडे हाताने कापून-जोडून हा पर्यावरणपूरक वाडा साकारला. तुळशीवृंदावन, विहीर, जातं, देवघर, तांब्या-पितळेची भांडी, पंगत, आजी-आजोबा, मुलांचे खेळ अशा बारकाव्यांतून वाडा-संस्कृती, परंपरा आणि एकत्र कुटुंबाच्या आठवणी जपल्या. उत्तर अमेरिकेत राहूनही पुढच्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख केवळ सांगायची नाही, तर ती अनुभवायला द्यायची आणि नात्यांमधला तो जुना ओलावा जपायचा... हीच या आरासीमागची खरी प्रेरणा!

Swapnil Kadam, PA

॥ श्री गणेशाय नमः ॥



माझा मुलगा रायन यावर्षी एक वर्षाचा झाला. ऑगस्ट महिन्यात सहजच इंडियन स्टोअरमध्ये गेल्यावर रायन धावतच एका मूर्तीकडे गेला आणि डोक्यावर हात ठेवून 'जय जय' करायला लागला. रायनला ती मूर्ती इतकी आवडली की आम्ही ती लगेच घरी घेऊन आलो. खरं तर, बाप्पानेच आम्हाला निवडलं होत! आता एवढी सुंदर मूर्ती असल्यावर आरासही तेवढीच आकर्षक हवी, म्हणून आम्ही लगेच तयारीला लागलो. बाप्पा म्हणजे आनंद, सुख आणि आयुष्यातला प्रकाश! याच संकल्पनेवर आधारित – पारंपरिक मराठी कमानी, झरोके, दिवे आणि छोट्या आरशांची आरास करायचं ठरलं. महिनाभराचे नियोजन, खरेदी आणि सलग दोन रात्री जागून ही आरास प्रत्यक्षात आली; आणि आमच्या घराचा कोपरा न कोपरा मंगलमय, तेजोमय झाला!

Kavita Santosh Mali, NJ

॥ श्री गणेशाय नमः ॥



This year ganpati aaras is related to beach theme . All mushakas are enjoying all the activities on beach . And our bappa is also enjoying to play in sand and he likes all the environment of beach . Every year I am making different theme and also celebrating bappa so my kids also know our traditions . I am very attached to this festival because I have lot of childhood memories about ganpati. Motive is to pass all my memories to my kids and they can pass to their next generation . Hope you all enjoy my decorations.

Rajashree Pathare, NC

॥ श्री गणेशाय नमः ॥



आमची आरास म्हणजे भक्ती, परंपरा आणि महाराष्ट्राच्या मातीशी जोडलेल्या भावविश्वाची एक सुंदर अनुभूती—आषाढी एकादशीची पंढरीची वारी. विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी, टाळ-मृदंगाचा गजर, रिंगण सोहळा आणि "पाऊले चालती पंढरीची वाट" या भावनेतून पंढरीचा भक्तिमय प्रवास साकारला आहे. "गणपती बाप्पांच्या सान्निध्यात विठ्ठलनामाचा गजर आणि भक्तीचा आनंद अनुभवता यावा, हीदेखील या आरासीची खास भावना आहे. आरास तयार करताना शक्य तितक्या पुनर्वापर करता येणाऱ्या आणि नैसर्गिक साहित्याचा वापर करून पर्यावरणपूरक सजावट करण्याचा प्रयत्न केला आहे. भक्ती, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम घडवणे, तसेच परदेशात राहून पुढच्या पिढीपर्यंत आपल्या महाराष्ट्राची वारकरी परंपरा पोहोचवणे, हीच या आरासीमागची प्रेरणा आहे.

Bharat Kandekar, NJ

॥ श्री गणेशाय नमः ॥



१ सप्टेंबर २०२६ माझ्या मुलाच्या आयुष्यातील नवीन सुरुवात...Rutgers विद्यापीठामध्ये त्याला प्रवेश मिळाल्यामुळे Camden येथे आलो. गावी बाप्पा असायचे, अमेरिकेमध्ये आल्यावर मित्रांच्या घरच्या गणपती डेकोरेशनमध्ये मदत करणे, आरतीमध्ये सहभागी होणे चालू होते, त्यामुळे आपल्या घरी बाप्पा नाहीत अशी उणीव कधीच जाणवली नाही. इथे आल्यावर मुलाच्या सोईसाठी विद्यापीठाच्या परिसरामध्येच राहण्याचा विचार केला, इथे कोणीही ओळखिचे नव्हते त्यामुळे यावेळी बाप्पा आजूबाजूला नसणार असे जाणवले ,आपणच बाप्पाला घरी आणू असे वाटले. संध्याकाळी चालण्यासाठी जायचो , त्यावेळी पूल, उंचइमारती ,खाली विद्यापीठाचा परिसर यांचे दृष्य अप्रतिम दिसायचे, विद्येच्या प्रांगणातच बाप्पाला घरी आणायची कल्पना सुचली त्यामुळे घरगुती साहित्य वापरून पूल, उंचइमारती, विद्यापीठ यामध्येच बाप्पाला बसवावे असे वाटले.

Patki family, CA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यावर्षीच्या गणेशोत्सवानिमित्त पत्की कुटुंबीयांनी "महाराष्ट्रातील पारंपरिक गावजीवनाची सुंदर झलक" या संकल्पनेवर आधारित आरास साकारली आहे. विहिरीतून पाणी भरणे, ताक घुसळून लोणी काढणे, जात्यावर दळणे, बैलगाडीतून धान्याची पोती नेणे, हळदी-कुंकू समारंभ आणि बांगड्या भरणाऱ्या महिला अशा प्रसंगांतून साधे, आनंदी आणि आपुलकीने भरलेले गावजीवन दाखवले आहे. मातीच्या घरांना पारंपरिक वारली कलेने सजवले असून, स्वतंत्र मंदिरात भजनी मंडळ भक्तिभावाने भजन सादर करताना दाखवले आहे. आरासेच्या पार्श्वभूमीवर लोकमान्य टिळकांचे चित्र ठेवून सार्वजनिक गणेशोत्सवामागील एकता, सामाजिक बांधिलकी आणि समाजाला एकत्र आणण्याची भावना अधोरेखित केली आहे. साधेपणा, भक्ती, परंपरा, सहकार्य आणि मानवी नात्यांतील प्रेम जपण्याचा संदेश ही आरास देते.

Subodh Kulkarni, IA

॥ श्री गणेशाय नमः ॥



श्री गणपती पंचायतन संस्थान, सांगली ही केवळ एका मंदिराची प्रतिकृती नाही तर माझे बालपण पुन्हा एकदा जगायचा प्रयत्न आहे. गेल्या वर्षी मुख्य मंदिराची प्रतिकृती तयार केली... आणि यावर्षी त्याचा प्रवेशद्वाराचा भाग साकारण्याचे ठरवले. ३० मे २०२६ रोजी सुरू झालेल्या या प्रवासात दोनशेहून अधिक तास कधी गेले, ते कळलेच नाही. मंदिराच्या परिसरात माझं बालपण गेलं.पहाटेची भक्तिगीते... सनई-चौघड्याचे सूर... छबिन्याची मिरवणूक... हत्ती, घोडे, उंट...आणि मंदिराजवळच्या त्या असंख्य छोट्या-छोट्या आठवणी... सीएनसी राउटर वापरला- प्लाईवुड मध्ये तयार केलेल्या सांगाड्यावर पॉलीशपेपर चिकटवले व रंगवले. दगड़ाचे टेक्सचर यावे म्हणून तसेच एंटीस्किड एडिटिव रंगात टाकले! माझा भाऊ प्रसन्न, बहीण प्रतिमा आणि मामी जाई जोशी यांच्या मदतीबद्दल आभार

Archannaa Mutalik, CT

॥ श्री गणेशाय नमः ॥



Our Aaras celebrates the devotion and spirit of Vitthal and the Pandharpur Wari. Inspired by Maharashtra's Warkari tradition, we recreated the journey to Pandharpur around our beloved Bappa. Celebrating our 17th year of welcoming Ganapati, this tradition also helps us pass our culture to our children, who actively participate in creating the decoration and celebration. Most elements were handmade, including Vitthal standing on his symbolic brick, a 3D illuminated halo, Sant Dnyaneshwar, Sant Tukaram, and Warkaris. Using foam, layered 3D techniques, handcrafted details, and warm lighting, we brought the spirit of Pandharpur into our home.

Rupali Prasad Malpure, CT

॥ श्री गणेशाय नमः ॥



गेली अनेक वर्षे गणपती बाप्पाच्या सजावटीत शेषनाग साकारण्याची इच्छा होती. यावर्षी सनरूम जवळ काळा गवताचा साप दिसला आणि कल्पनेला आकार मिळाला. वादळ-पावसापासून बाप्पाचे रक्षण करण्यासाठी शेषनाग आपल्या फण्याने छत्र धरून उभा आहे, अशी संकल्पना केली. वेली, झाडे, कार्डबोर्ड, ३५ फूट पाण्याची होज आणि एक प्लांट पॉट वापरून जंगल व शेषनाग साकारला. लाईट्स, मेघगर्जना, सापाचा आवाज आणि धुपाच्या दरवळाने सजावट जिवंत झाली. गणपती बाप्पा आणि शेषनागाची रांगोळी काढून बाप्पाचे स्वागत केले. २०० हून अधिक लोकांनी भेट देऊन बाप्पाचे आशीर्वाद घेतले—हीच आमच्या मेहनतीची खरी पावती आणि कुटुंबासाठी सर्वात मोठा आनंद ! गणपती बाप्पा मोरया! 🌺

Swati Atul Wadyalkar, GA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाचा गणपती 'मावळा' रूपात आणला आणि बाप्पा काही करून गेला! गावाकडची बाप्पाच्या आगमनाची लगबग—लहान मुलांपासून आजी-आजोबांपर्यंत—अमेरिकेत राहून अनुभवण्याचा प्रयत्न केला. आर्ट-अँड-क्राफ्ट बॉक्समधील साध्या टिकल्या, गोल्डन पेपर, कंदिलासाठी आणलेले रंगीत कागद आणि वस्तू मावळा थीमशी जोडत गेले; मन आनंदून गेले. इको-फ्रेंडली बाप्पामुळे समाधान मिळाले. आगमन, आरती, ताल-ढोलकी, मोदक, पाटोड्या, जेवण आणि मुलांपासून मोठ्यांपर्यंतचा सहभाग—जणू मोठ्या कुटुंबाचे गेट-टुगेदर! कुणी स्वयंपाकात, कुणी तयारीत, मुलं मजेत, मोठे आरतीत; सर्वत्र आनंद, आपुलकी, भक्ती, आणि बाप्पाही ही लगबग पाहत होता. अमेरिकेत गावची आठवण जपत संस्कृती पुढे नेण्याचा आनंद मिळाला. पुढच्या पिढीपर्यंत ही प्रथा, आपुलकी, भक्ती आणि प्रेम पोहोचत राहो, प्रार्थना. माझे प्रयत्न मुंगीएवढे, एका मावळ्याएवढे पण मनापासून केलेले! हीच माझ्या "मावळा" आरासामागची गोष्ट... ❤️

Prutha Gandhi and Aarohi Shrike

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाचा आमच्या घरचा चलचित्र देखावा माझ्या दोन्ही मुलींनी — प्रुथा गांधी आणि आरोही शिर्के — त्यांच्या कल्पकतेने आणि मेहनतीने तयार केला आहे. यावर्षी मुलींनी गोकुळातील श्रीकृष्णाच्या सुंदर बाललीलांचा देखावा साकारला आहे. 💙🦚🪈🌸 श्रीकृष्णाच्या गोकुळातील अनेक लीला त्यांना आधीपासूनच माहीत होत्या, त्यामुळे त्या लीलांना स्वतःच्या कल्पनेतून देखाव्यात साकारण्याचा त्यांचा उत्साह पाहून खूप आनंद झाला! 🥰❤️

हा देखावा चौथीतल्या दोन छोट्या मुलींचा असल्यामुळे अजून पूर्णपणे तयार झालेला नाहीये 😊❤️ पण त्यांच्या उत्साहाचं आणि मेहनतीचं कौतुक म्हणून, त्यांना हवा तसा देखावा आणि सजावट करण्यासाठी आम्ही त्यांना पूर्ण मोकळीक दिली आहे. 🥰🎨✨ त्यांची कल्पनाशक्ती आणि बाप्पासाठी काहीतरी स्वतः बनवण्याचा उत्साह पाहून खरंच खूप आनंद झाला!

BRUHAN MAHARASHTRA MANDAL · YOUTH

युवा YUWA

BUILD.
LEAD.
BELONG.

Built by youth. For youth. मराठी at heart.

तुझी आवड, तुझी कौशल्यं, तुझी मराठी ओळख — सगळं एकाच squad मध्ये.

01

BMM Yuwa Connect

युवा कनेक्ट

उत्तर अमेरिकेतील मराठी तरुणाईचं नेटवर्क. नवे मित्र, meetups आणि online community — तू कुठेही असलास/असलीस तरी connected.

Meetups · Network · Community · Fun

02

Digital & Creative Team

डिजिटल आणि क्रिएटिव्ह टीम

BMM चा digital आवाज तुझ्या हातात. Reels, design, website, analytics आणि AI — खरे projects, खरा impact.

Social Media · Design & Video · Web & UX · AI & Analytics

03

Youth Leadership Program

युवा नेतृत्व विकास

Workshops, mentors आणि खरी जबाबदारी. Ideas मांड, teams lead कर — उद्याचे BMM leaders इथे घडतात.

Workshops · Internships · Public Speaking · Leadership

04

Mentoring & Volunteer Hours

मार्गदर्शन आणि स्वयंसेवा तास

Mentors कडून guidance, आणि तुझ्या प्रत्येक volunteer तासाची नोंद. Hours log कर, approve करून घे, certificate मिळव.

Mentors · Hours Tracker · Certificates · PVSA

Join the squad →

Scan कर, form भर, आणि सुरुवात कर!

yuwa@bmmonline.org
bmmdigital@bmmonline.org
IG @BMM.NorthAmerica

Arpita, Sapana, Dipsy, Bhavini, Kavita

॥ श्री गणेशाय नमः ॥



पाच कुटुंबे, एक बाप्पा, आणि एका सुंदर प्रवासाची गोष्ट
यंदाची आरास आमच्या Zion National Park मधील प्रत्यक्ष साहसी प्रवासापासून प्रेरित आहे. Angels Landing आणि The Narrows मधील निसर्गसौंदर्य, खडक आणि जलप्रवाह आम्ही साध्या साहित्याने, कल्पकतेने, मेहनतीने आणि DIY पद्धतीने बाप्पाच्या सभोवती साकारले. गेल्या वर्षीची आरास आमच्या **Everest Base Camp ट्रेकपासून प्रेरित** होती. आमच्यासाठी ही केवळ आरास नाही—**आमच्या मैत्रीचा, साहसाचा, आठवणींचा, एकतेचा आणि बाप्पावरील निस्सीम भक्तीचा सुंदर प्रवास आहे.**
टीम: Arpita Kadre, Sapana Shah, Dipsy Parikh, Bhavini Mehta & Kavita Shah

Swara Yogesh Wadekar

॥ श्री गणेशाय नमः ॥



या वर्षीची आमची गणपती सजावट सरस्वती देवीच्या संकल्पनेवर आधारित असून, ती पूर्णपणे घरीच प्रेम, भक्ती आणि कल्पकतेने तयार केली आहे. बाप्पांची मूर्ती, मांडणी आणि सजावट आम्ही उपलब्ध साहित्याचा वापर करून DIY पद्धतीने केली आहे. मी आणि माझ्या मोठ्या बहिणीने ही संकल्पना निवडली, कारण गणपती बाप्पा आणि सरस्वती देवी हे ज्ञान, शिक्षण आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक मानले जातात. मी इयत्ता नववीत, तर माझी बहीण मास्टर्सच्या शिक्षणाला सुरुवात करत आहे. या नवीन प्रवासासाठी आम्ही दोघींनी त्यांचे आशीर्वाद घेतले. थोडी परंपरा, कल्पकता आणि भक्ती, या सर्वांचा संगम. 🙏

🌺 ॐ सरस्वती नमो नमः। 🌺 🌺 गणपती बाप्पा मोरया! 🌺

स्वरा योगेश वाडेकर, अल्बानी, न्यूयॉर्क

Dilip Dalvi

॥ श्री गणेशाय नमः ॥



या सुशोभनातून श्री गणेशाच्या मंगलमय सान्निध्यात संत ज्ञानेश्वर माऊलींचे करुणामय, तेजस्वी जीवन आणि विश्वकल्याणाचा अमर संदेश साकारला आहे. निवृत्तीनाथ, सोपानदेव आणि मुक्ताबाई या भावंडांसह ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञान, भक्ती, समता आणि प्रेमाचा मार्ग दाखवून समाजाला अंतर्मुख केले. रेड्याच्या मुखातून वेद वदविण्याचा प्रसंग ज्ञान कोणत्याही विशिष्ट समूहाची मक्तेदारी नसून समाजातील प्रत्येक व्यक्तीचा, अगदी शेवटच्या घटकाचाही अधिकार आहे, हा हृदयस्पर्शी संदेश देतो. चांगदेव प्रसंगात वाघावर आरूढ चांगदेव आणि चालत्या भिंतीवर विराजमान ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे अहंकारापेक्षा आत्मज्ञान श्रेष्ठ असल्याचे प्रभावीपणे दर्शवतात. ज्ञानेश्वरीतून त्यांनी गीतेचे गूढ ज्ञान सामान्य जनांच्या हृदयापर्यंत पोहोचवले. हरिपाठातून सतत भगवंताचे स्मरण घडविले, तर पसायदानातून संपूर्ण विश्वाच्या सुख-शांतीची आर्त प्रार्थना केली. “हे विश्वचि माझे घर” आणि “अवघाची संसार सुखाचा करीन” या विचारांतून त्यांनी प्रेम, एकता, समता आणि सर्वांच्या कल्याणाची ज्योत प्रज्वलित केली.

Archana Pansare

॥ श्री गणेशाय नमः ॥



आमच्या घरात आरास करण्यामागचा हेतू एकच—घरातील प्रत्येकाचा थोडा का होईना सहभाग असावा आणि बाप्पासाठी आपण काय करू शकतो, याचा आनंद घ्यावा. दरवर्षी काहीतरी नवीन करण्याचा आमचा प्रयत्न असतो. यावर्षी मुलांना असलेल्या केदारनाथच्या आकर्षणामुळे केदारनाथ थीम निवडली. भीमशिळेने मंदिराचे रक्षण केले, ही गोष्ट मुलांसाठी विशेष कुतूहलाची होती. मग हिमालय, मंदिर आणि नदी कशी साकारायची यावर चर्चा करून आरास तयार झाली. थोडी धाकधूक होती, पण बाप्पाच्या कृपेने सर्व सुंदर जमले. गणपतीचे ११ दिवस म्हणजे उत्साह, मोदक, आरत्या, दर्शन आणि जल्लोष! यावर्षी आमच्या गणपतीला १५ वर्षे पूर्ण झाली, तरी उत्साह तसाच आहे. मुलांच्या आरत्या पाठ झाल्या आहेत—हीच संस्कृतीची खरी जपणूक. गणपती बाप्पा मोरया! पुढच्या वर्षी लवकर या!

Damini Pratik Bhosale


॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाची आमची आरास शिवमंदिराच्या संकल्पनेवर आधारित आहे. बाप्पाला शिवाच्या पवित्र सान्निध्यात विराजमान करण्याची कल्पना आम्हाला विशेष भावली. आमच्या मुलाचं नाव Rudraansh — रुद्राचा अंश — त्यामुळे ही संकल्पना आमच्यासाठी आणखी खास आहे.
आमचे मित्र केतन दरवर्षी आमच्या theme नुसार eco-friendly बाप्पाची मूर्ती हाताने घडवतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संपूर्ण आरास eco-friendly असून, पिलर्स, भिंती आणि अगदी शिवलिंगही टाकाऊ cardboard पासून तयार केले आहे. जवळपास दोन महिने आम्ही कुटुंबाने मिळून ही आरास साकारतो. आमचा तीन वर्षांचा मुलगाही decoration मध्ये आम्हाला मदत करतो आणि ही process खूप enjoy करतो.
आमच्यासाठी ही केवळ सजावट नाही; बाप्पासोबत निर्माण केलेल्या आनंदाच्या आणि सुंदर आठवणींचा हा उत्सव आहे.

Kumu Gupta

॥ श्री गणेशाय नमः ॥



I recently started painting a year ago and have done few acrylic on canvas paintings.During Ganesh Chaturthi I asked my art class teacher if I can try Lord Ganesha picture to paint. I picked easy one and painted it. This is first time doing painting of a God. And then put the picture of the painting in AI generated Indian theme digital frame. Also took picture of 2 Modaks got from Indian restaurant and put in AI generated Indian design digital frame. Both painting Ganpati and having Modak in US are a first for me after 20+ yrs here.

Leena Aniruddha Deshpande

॥ श्री गणेशाय नमः ॥



Lahanpani majhya vadilanni shikavlela ek sketch me sakarun janu kahi jagledekhil. Majhya dekhavyaat mage dongar, tyatun vahanar jhara, paythyashi talav, nadi(river). nadichya eka bajula jungle tar dusrya bajula sundar ghar. Gharasamor angaN, tulashivrindavan, khalnari mula, maage chotasa shet. Shaharasunduur asa shant jeevan kunala nako asta, nahi ka? Bappa chya krupene aaj te sakarta ala. Bappa sarwanna asach shant, samadhanane bharlela gharacha ashirvad deo. Ganapati Bappa Morya!

Tanavi Borhade, Windsor

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाच्या गणपती सजावटीची प्रेरणा आम्हाला आमच्या नुकत्याच केलेल्या स्वित्झर्लंडच्या प्रवासातून मिळाली. प्रवासादरम्यान आम्ही Zermatt आणि Matterhorn पर्वताचे मनमोहक सौंदर्य अनुभवले. त्या सुंदर आठवणी Windsor, Canada येथील आमच्या गणपतीच्या सजावटीत साकारण्याचा आम्ही प्रयत्न केला. बर्फाच्छादित Matterhorn, Zermatt मधील सुंदर घरे, छोट्या गल्ल्या, झाडे, रोषणाई आणि रेल्वे यांची प्रतिकृती तयार करून त्यामध्ये बाप्पांना विराजमान केले. स्वित्झर्लंडच्या प्रवासाच्या आठवणी आणि महाराष्ट्राची गणपती परंपरा यांचा हा सुंदर संगम आहे. परदेशात राहूनही आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहण्याचा हा आमचा मनापासून केलेला छोटासा प्रयत्न आहे. 🙏

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उपक्रम — प्रमुख उपक्रम

BMM मराठी शाळा

माझी मराठी भाषा, माझी मराठी शाळा

२००९	५०+	१२५+	५,०००+	४००+
पासून सुरू	शाळा	शाखा	विद्यार्थी	स्वयंसेवक शिक्षक

उपक्रमाचा उद्देश

परदेशात वाढणाऱ्या आपल्या मुलांना मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीशी जोडून ठेवणे हा मराठी शाळेचा उद्देश आहे. २००९ साली सुरू झालेला हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा सर्वात मोठा उपक्रम आज अमेरिका, कॅनडासह जगातील अनेक देशांत पोहोचला आहे. BMM चा प्रमाणित अभ्यासक्रम, पुस्तके आणि शिक्षक मार्गदर्शिकांच्या मदतीने स्वयंसेवक शिक्षक मुलांना मराठी वाचन, लेखन आणि संभाषण शिकवतात.

कसे सहभागी व्हाल?

1. **प्रवेश घ्या**
   पुढील पानावरील यादीतून आपल्या जवळची BMM मराठी शाळा शोधा.
2. **स्वयंसेवक शिक्षक व्हा**
   ४००+ शिक्षकांच्या परिवारात सामील व्हा. BMM प्रशिक्षण साहित्य देते.
3. **नवी शाळा सुरू करा**
   स्थानिक मंडळ, समन्वयक आणि BMM अभ्यासक्रमासह आपल्या भागात शाळा सुरू करा.

भारती विद्यापीठ, पुणे
२००९ पासून मान्यताप्राप्त अभ्यासक्रम. २०२६ मध्ये सुमारे ३,००० विद्यार्थी BMM परीक्षा देत आहेत.

बालभारती · महाराष्ट्र शासन
२०२५ पासून बालभारती अभ्यासक्रम व परीक्षा. २०२६ मध्ये सुमारे ३०० विद्यार्थी.

AVANT STAMP परीक्षा
Seal of Biliteracy आणि कॉलेज क्रेडिट मिळवण्याची संधी.



श्री. राहुल देशमुख
मराठी शाळा प्रमुख
Marathi Shala Lead · BMM



सौ. मयुरी नाईक
मराठी शाळा संचालक
Marathi Shala Director · BMM

सहभागी व्हा!

ईमेल: rahul.deshmukh@bmmonline.org · वेबसाइट: bmmonline.org/marathishala

BMM मराठी शाळा शाळांची यादी

जगभरातील BMM मराठी शाळा

आपल्या जवळची शाळा शोधा आणि आजच प्रवेश घ्या

अमेरिका USA · 64

- **A2mm Novi Marathi Shala** — Novi, MI
- **Austin Marathi Shala** — Austin, TX
- **Baltimore Marathi Shala** — Sykesville, MD
- **CRC-MLP Marathi** — Cockeysville, MD
- **Buffalo Marathi Shala** — Buffalo, NY
- **Charlotte Marathi Shala** — Charlotte, NC
- **Colorado Marathi Shala** — Parker, CO
- **Columbus Indiana Marathi Shala** — Columbus, IN
- **Columbus OH Marathi Shala** — Columbus, OH
- **CTMM Marathi Shala** — Glastonbury, CT
- **Miboli Marathi Shala** — Dallas, TX
- **Plano Marathi Shala** — Frisco, TX
- **Vidya Vikas Marathi Shala** — Irving, TX
- **DVMMM Marathi Shala** — Hockessin, DE
- **East Bay Marathi Mandal's Marathi Shala** — San Ramon, CA
- **Greater Richmond Marathi Shala** — Glen Allen, VA
- **GVLMM Marathi Shala** — Greenville, SC
- **HMM Marathi Shala** — Houston, TX
- **MMJAX Marathi Shala** — St. Johns, FL
- **LVMM Marathi Shala** — Las Vegas, NV
- **MMTB Marathi Shala** — Tampa, FL
- **MMBA Marathi Shala** — Santa Clara, CA
- **MMC's Chicago Marathi Shala** — Chicago, IL
- **MMD Canton Marathi Shala** — Canton, MI
- **Troy Marathi Shala** — Troy, MI
- **Torrance Marathi Shala** — Torrance, CA
- **Tri Valley Marathi Shala** — Thousand Oaks, CA
- **Valencia Marathi Shala** — Valencia, CA
- **Inland Empire Marathi Shala** — Riverside, CA
- **Irvine Marathi Shala** — Irvine, CA
- **North East Wisconsin Marathi Shala** — Green Bay, WI
- **Milwaukee Marathi Shala** — Brookfield, WI
- **Atlanta Marathi Shala** — Cumming, GA
- **Harrisburg Marathi Shala** — Mechanicsburg, PA
- **Marathi Shala Kansas City** — Overland Park, KS
- **MMOSF Marathi Shala** — Pembroke Pines, FL
- **MSMI Marathi Shala** — Fishers, IN
- **MAM Marathi Shala** — Minneapolis, MN
- **Gurukul Marathi Shala** — Washington, DC
- **Abhinav Balniketan Peoria** — Peoria, IL
- **Marathi Shala Sacramento** — Sacramento, CA
- **Bridgewater Marathi Shala** — Bridgewater, NJ
- **Edison Marathi Shala** — Edison, NJ
- **Morganville NJ Marathi Shala** — Morganville, NJ
- **South Brunswick Marathi Shala** — South Brunswick, NJ
- **Lansing Marathi Shala** — Lansing, MI
- **ISW Marathi Shala** — Shrewsbury, MA
- **Sankalp Marathi Shala** — Cumberland, RI
- **NEOMM Marathi Shala** — Cleveland, OH
- **Oregon Marathi Shala** — Beaverton, OR
- **Orlando Marathi Shala** — Casselberry, FL
- **Greensboro Marathi Shala** — Greensboro, NC
- **OKC Marathi Shala** — Oklahoma City, OK
- **Birmingham AL Marathi Shala** — Birmingham, AL
- **Philadelphia Marathi Mandal Shala** — Philadelphia, PA
- **Phoenix Marathi Shala** — Phoenix, AZ
- **Pittsburgh Marathi Shala** — Pittsburgh, PA
- **RTP Marathi Shala** — Cary, NC
- **San Antonio Marathi Shala** — San Antonio, TX
- **SDMM Marathi Shala** — San Diego, CA
- **Seattle Marathi Shala** — Redmond, WA
- **Saint Louis Marathi Shala** — Saint Louis, MO
- **Triveni Marathi Shala of Cincinnati** — Mason, OH
- **Utah Marathi Mandal Marathi Shaala** — Lehi, UT

कॅनडा Canada · 8

- **Calgary Marathi Shala** — Calgary, AB
- **MBME Marathi Shala** — Edmonton, AB
- **North York Shala** — North York, ON
- **Mississauga Marathi Shala** — Mississauga, ON
- **Northyork TDSB Marathi Shala** — Toronto, ON
- **Online Marathi Shala** — Mississauga, ON
- **Kilbil Marathi Shala** — Vancouver, BC
- **Ottawa Marathi Shala** — Ottawa, ON

युरोप Europe · 5

- **Marathi Shala Austria** — Graz, Austria
- **Marathiboli Norway** — Oslo, Norway
- **Maharashtra Mandal Denmark** — Copenhagen, Denmark
- **NORWEMA Marathi Shala** — Northwest, UK
- **Marathiboli Shala Sweden** — Sweden

आशिया Asia · 2

- **Marathi Shaala Dubai** — Dubai, UAE
- **MMHK Marathi Shaala** — Hong Kong

ऑस्ट्रेलिया Australia · 1

- **Adelaide Marathi Vidyalay** — Adelaide, Australia

संपूर्ण व अद्ययावत यादी: bmmonline.org/marathishala

Pradeep Chintale,Downingtown,PA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाच्या गणपतीची थीम ठरवताना माझी मुलगी प्रिशाने मला विचारले, “बाबा, यावर्षीची थीम काय?” मी गंमतीने “महाभारत” म्हटले. तेव्हा तिने आव्हान दिले, “माझ्या वयाच्या मुलांना आवडेल अशी काहीतरी थीम करा!” त्याच वेळी Stranger Things चा अंतिम सीझन आला आणि तिच्या मनात कल्पना आली—“Stranger Things with Bappa!”

हीच कल्पना आमच्या २०२६ च्या गणपती सजावटीची प्रेरणा ठरली. आम्ही बाप्पाच्या भक्तीला आजच्या पिढीच्या आवडत्या विश्वाशी जोडले. देखाव्याच्या क्लायमॅक्समध्ये भगवान शिव त्रिशूळासह श्री गणेशाबरोबर येऊन Demogorgon चा पराभव करतात—प्रकाशाचा अंधारावर विजय दर्शवितात. हा देखावा आमच्यासाठी विशेष आहे, कारण तो प्रिशाच्या कल्पनेतून साकारला असून, मराठी संस्कृती, श्रद्धा आणि नव्या पिढीची सर्जनशीलता यांचा सुंदर संगम आहे. 🙏

Prajakta Joshi & Aadit karanjikar

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाची आमची गणपती सजावट म्हणजे गणेशाच्या कैलासावरच्या घरवापसीची एक हळवी कथा...आपला लाडका गणेशा कैलासावर, आपल्या बाबांच्या—महादेवांच्या कुशीत येऊन बसला आहे. कधी काळी आपल्या मुलाला न ओळखल्यामुळे निर्माण झालेल्या गैरसमजांमुळे गणेशाला बाबांचे प्रेम अनुभवता आले नाही. पण आज तोच गणेशा आपल्या बाबांच्या कुशीत बसून राहिलेलं सगळं प्रेम, माया आणि वात्सल्य मनसोक्त अनुभवत आहे.बाप-लेकाच्या या सुंदर मिलनाचा, प्रेमाचा आणि मायेचा क्षण म्हणजेच— ❤️ “बाबाच्या कुशीत... कैलासावरचा गणेशा” ❤️

Apurva Joshi-Pujari, PA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाची आमची आरास महाराष्ट्रातील पुरातन कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर या संकल्पनेवर आधारित आहे. कोल्हापूर महालक्ष्मी हे खूप जागुर्त दैवत आहे. महालक्ष्मीची मूर्ती ही खूप तेजस्वी आणि दागिने कोल्हापुरी साज, पुतळायची माळ, ठुशी ह्यांनी सजलेली आहे. देवीच्या मागे सोन्याची प्रभावळ आहे. मंदिराबाहेर दीप माळा उभ्या केल्या आहेत. लोकाना महाराष्ट्रातल्या मंदिरांची आणि सस्कृती याची माहिती व्हावी त्यासाठी हा छोटासा प्रयत्न केला आहे.

Varsha Patil, USA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यावर्षीची बाप्पांची आरास माझ्यासाठी खूप खास होती. निसर्गाच्या कुशीत विराजमान झालेले बाप्पा, हा विचार मनात ठेवून डोंगर, हिरवळ, ढग आणि वाहता धबधबा साकारला. प्रत्येक गोष्ट करताना बाप्पाप्रतीची श्रद्धा आणि प्रेम मनात होतं. पण यावेळची सगळ्यात सुंदर गोष्ट म्हणजे माझ्या मुलांनीही स्वतःहून आरास करण्यात सहभाग घेतला. दरवर्षी ते फक्त माझी लगबग पाहायचे, पण यावेळी त्यांनी स्वतः पुढे येऊन छोट्या छोट्या गोष्टी करण्यास सुरुवात केली. त्यांच्या उत्साहाने ही आरास आणखी खास झाली. आपल्या परंपरा आणि बाप्पाची भक्ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचतेय, यापेक्षा सुंदर समाधान दुसरं काय असू शकतं?

Arati Bhingole- Mehtre, PA

॥ श्री गणेशाय नमः ॥



आमच्या गणपती सजावटीची थीम “शिवतत्व आणि गणेशभक्तिचा सुंदर संगम” अशी आहे. मध्यभागी असलेले त्रिशूळ, त्रिपुंड, चंद्रकोर आणि डमरू हे भगवान शंकराचे प्रतीक आहेत. वरचे पांढरे ढग कैलास पर्वताचे दिव्य वातावरण दाखवतात. लाल कमळावर विराजमान गणपती बाप्पा हे सजावटीचे मुख्य आकर्षण आहे. फुलांच्या माळा, दिव्यांची रोषणाई, समई, रांगोळी आणि पारंपरिक सजावटीमुळे संपूर्ण वातावरण मंगलमय आणि भक्तिमय झाले आहे. बाप्पासमोर ठेवलेले मोदक, फुले आणि नैवेद्य श्रद्धा व समृद्धीचे प्रतीक आहेत. या थीममधून भगवान शंकर आणि गणपती बाप्पा यांचे पवित्र नाते, भारतीय संस्कृती, भक्ती आणि सकारात्मक ऊर्जा सुंदरपणे दर्शवली आहे.

Ashwini Rane, NC

॥ श्री गणेशाय नमः ॥



वेंकटेश्वरा govidha, आम्ही २०१४ मध्ये अमेरिकेत आलो , आणि काहीनी संगीतल की तुम्हाला माणसं हवी असेल , एकट वाटू नये तर तुम्ही मदिरात जा ...आणि मग आम्ही भारतीय टेम्पल , वेंकटेश टेम्पल मध्ये जाऊ लागलो. आमच्या घरांच्या बाजूला नॉर्थ कॅरोलिन मध्ये, माझा नवरा सचिन तिथे almost रोज सेवेला जातो. ह्या वर्षी काहीतरी वेगळं करायचं तर विठ्ठल theme , अष्टविनायक theme असे खूप गोष्टी मी सचिन ला व सुचवत होते. सजावट करताना सर्व प्रथम एक मोठी उभी आणि छोटी आडवी काठी जॉइन करून घेतली, थोडी गुगल ची मदत घेतली आणि दोन्ही जोडलेल्या काठ्यवर केलेल्या एक एक फुलांचे माळा लावल्या. साडी आणि ओढणीच्या वापर करून आम्ही background लावून घेतली. वेंकटीवरचा मुखवटा आम्ही ऑनलाइन साइट वरून घेतला , गणपती च्या सजावटीमध्ये मुख्य असते ती मूर्ती आणि गणपती च्या कृपेने आम्हाला आमच्या थीम ला साजेशी अशी नाम ओढलेली गणपतीची मूर्ती सुद्धा मिळाली. आमच्या कडे गणपती च्या आरती ला येणाऱ्या सगळ्यांना सजावट खूप आवडली . थीम या उद्दिष्टाने आम्ही सादर केली होती की वेंकटेश्वर म्हणणे गणपती आणि गणपती म्हणजे वेंकटेश्वर, अगदी आपल्या घराबाहेरच्या वेंकटेश्वर मदिरातला मूर्ती आणि शृंगार इथे ही background ला देखावा करावा. Govindha govindha

Yash Gondkar, MA

॥ श्री गणेशाय नमः ॥



करवीर निवासिनीच्या भूमीतून, श्री बालाजींच्या चरणी
कोल्हापूरच्या श्रीमहालक्ष्मीच्या पावन भूमीत वाढलेल्या आम्हा कुटुंब आणि मित्रांनी यंदा बाप्पासाठी एक खास आरास साकारली. देवीशी जोडलेलं काहीतरी बनवण्याच्या विचारातून तिचे पती श्री तिरुपती बालाजी यांची संकल्पना सुचली. ७ ते ९ वर्षांच्या लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनी एकत्र येत पुठ्ठा, कागद, माती, रंग आणि ग्लिटरचा वापर करून तिरुमला येथील मूळ गभारा व मूर्ती स्वतःच्या हातांनी तयार केली. लहानांची उत्सुकता, मोठ्यांचे मार्गदर्शन आणि भक्तीभावातून साकारलेली ही आरास आमचा एक छोटासा भक्तिमय प्रयत्न आहे!

Bhagyashree Shreekant Kumbhar, OK

॥ श्री गणेशाय नमः ॥



आरास मोठी असावी की मनापासून केलेली? आम्ही दुसरा पर्याय निवडला! 😄 घरात उपलब्ध असलेल्या वस्तू, थोडी कल्पकता आणि भरपूर उत्साह यांच्या मदतीने यंदाची बाप्पांची आरास साकारली. पानांचा backdrop, साडीचे आसन, gym mat व boxesमधून तयार केलेले levels आणि साध्या Hula Hoopचे फुलांनी सजवलेले सुंदर वलय—सगळे काही घरच्या घरी! सून-सासरे आरासीत व्यस्त, पती-सासू प्रसादात आणि ८ वर्षांची लेक संपूर्ण प्रोजेक्टची "Creative Director"! मित्र-आप्तांसोबत आरती, वडापाव, पावभाजी आणि उकडीचे मोदक करत ओक्लाहोमात मराठी संस्कृतीचा उत्सव तितक्याच प्रेमाने साजरा केला.
भाग्य "श्री" कांत कुंभार

Hrishikesh Mindhe, MA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाचा गणेशोत्सव माझ्यासाठी केवळ उत्सव नाही... तो इतिहासाशी जोडलेला एक भावनिक प्रवास आहे. माझ्या सजावटीतील हा गड म्हणजे त्या सह्याद्रीची आठवण, जिथून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जाज्वल्य प्रेरणा दिली. त्यांच्या शौर्याने, दूरदृष्टीने आणि हिंदवी स्वराज्याच्या विचाराने महाराष्ट्राच्या अस्मितेला नवा अर्थ दिला. म्हणूनच या गडावर माझा गणराय विराजमान आहे... श्रद्धेच्या रूपात आज, आणि स्वराज्याच्या प्रेरणेच्या रूपात सदैव. प्रत्येक दगडात इतिहास आहे, प्रत्येक भगव्या रंगात अभिमान आहे आणि प्रत्येक क्षणात महाराजांची आठवण आहे. ही सजावट माझी कलाकृती नाही... ही माझ्या मातीला, संस्कृतीला आणि महाराजांना अर्पण केलेली मनःपूर्वक मानवंदना आहे. गड दगडांनी उभा राहतो, पण स्वराज्य विचारांनी उभे राहिले होते त्याची आजच्या युगाला एक प्रेरणा.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उपक्रम BMM उपक्रम

मोफत सत्रे

आरोग्य, अर्थ, मन आणि विचार — सर्वांसाठी खुली, नियमित सत्रे

आरोग्य संपदा
HEALTH IS WEALTH

आरोग्य, आहार, व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन. प्रश्न विचारा, शंका दूर करा आणि निरोगी राहा.

दर दुसऱ्या शनिवारी · सकाळी ११ ET — /arogyasampada

अर्थमंथन
MONEY TALK

गुंतवणूक, बचत, कर आणि निवृत्ती नियोजन अशा आर्थिक विषयांवर मोकळी चर्चा. पैशाचे प्रश्न, सोप्या भाषेत.

रविवार · सायं. ५ ET — /arthmanthan

उत्तररंग
SR. CITIZEN FORUM

ज्येष्ठ नागरिकांसाठी संवाद, अनुभवांची देवाणघेवाण आणि विरंगुळा. नवे मित्र आणि नवी ऊर्जा.

दर दुसऱ्या शनिवारी · दु. ३ ET — /uttarrang

ध्यान
MEDITATION

मनःशांती आणि एकाग्रतेसाठी मार्गदर्शित ध्यान सत्र. आठवड्याची सुरुवात शांत आणि प्रसन्न मनाने करा.

दर रविवारी · सकाळी ११ ET — /meditation

तत्वज्ञान
PHILOSOPHY

भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास, चिंतन आणि चर्चा. जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन देणारे सत्र.

साप्ताहिक सत्र — /philosophy

करओके
KARAOKE

गाण्याची हौस असणाऱ्यांसाठी करओके मैफल. आवडती गाणी गा, इतरांना ऐका आणि संगीताचा आनंद घ्या.

२रा व ४था रविवार · सायं. ५ ET — /karaoke

सत्रात सहभागी व्हा!

सत्रांच्या लिंक आणि अद्ययावत वेळापत्रकासाठी QR स्कॅन करा किंवा भेट द्या: **bmmonline.org/initiatives**

Vinita Nehete,OH

॥ श्री गणेशाय नमः ॥



यावर्षी बाप्पाच्या आरासेसाठी निळा आणि पांढरा रंग यांची मनमोहक सांगड घातली आहे. शांतता, सकारात्मकता आणि भक्ती या तीन भावनांना केंद्रस्थानी ठेवून ही निळी-शुभ्र आरास साकारली आहे. निळ्या फांद्या, शुभ्र फुले, मोत्यांची नाजूक सजावट आणि लुकलुकणारे दिवे यांचा वापर करून एक शांत, स्वप्नाळू वातावरण तयार केले आहे. सजावटीतील प्रत्येक घटक प्रेमाने आणि भक्तिभावाने निवडला आहे. बाप्पाकडे पाहताना मनाला प्रसन्नता आणि शांतता मिळावी, हीच सजावटीमागची कल्पना होती. साधेपणा, सौंदर्य आणि भक्ती यांचा सुंदर मिलाफ साधण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. साधेपणा आणि आधुनिक सजावटीची सांगड घालत ही आरास साकारली आहे.

Anita Sonawane, CA

॥ श्री गणेशाय नमः ॥



या आरासेची संकल्पना भगवान शिवांचे निवासस्थान असलेल्या पवित्र कैलास पर्वताच्या दिव्य आणि शांत वातावरणातून प्रेरित आहे. हिमालयातील बर्फाच्छादित पर्वत, शुभ्र ढग, निळे आकाश आणि ध्यानस्थ शिवशंकर यांच्या माध्यमातून कैलासाची आध्यात्मिक अनुभूती साकारण्याचा प्रयत्न केला आहे. मध्यभागी ध्यानमग्न शिव आणि त्यांच्या चरणी विराजमान श्री गणेश हे भक्ती, ज्ञान, संस्कार आणि मंगलमयतेचे प्रतीक आहेत. कापूस, कार्डबोर्ड, कागद, लाईट्स आणि इतर साध्या व पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा कल्पकतेने वापर करून ही आरास तयार केली आहे. "शिवचरणी भक्ती, मनात शांती आणि जीवनात सकारात्मकता" हा या आरासेमागील मुख्य विचार आहे.

Snehal & Ashish Urankar, WA

॥ श्री गणेशाय नमः ॥



🌸 गणपती सजावट – “जयपूरच्या शीश महालातून बाप्पाच्या दरबारात” 🌸
आमच्या नुकत्याच झालेल्या जयपूरच्या प्रवासातून प्रेरणा घेत, यंदाच्या गणपती सजावटीत राजस्थानी राजेशाही आणि शीश महालाची भव्यता साकारण्याचा प्रयत्न केला आहे. आरशांची नक्षी, निळ्या कमळांची कलाकुसर, पारंपरिक कंदील आणि फुलांची सजावट यामधून जयपूरच्या राजवाड्यांची सुंदर आठवण जपली आहे.
ज्या वैभवात राजे-महाराजे राहत असत, त्याच शाही वातावरणात आमच्या बाप्पाचे आगमन व्हावे, हीच या सजावटीमागची भावना.

Priyanka & Rushikesh Ranade, ON

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाच्या सजावटीसाठी आम्ही महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेचे प्रतीक असलेल्या वारली चित्रकलेची निवड केली. साध्या रेषा, नाजूक आकृती आणि भूमितीय आकारांतून निसर्ग, सण आणि माणसांमधील नात्यांचे सुंदर दर्शन घडवणारी ही कला आम्हाला नेहमीच विशेष भावते. या सजावटीतून पारंपरिक कलेचा साधेपणा, मातीशी असलेले नाते आणि आपल्या संस्कृतीची उब जपण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक आकृतीतून आनंद, उत्सव आणि एकोप्याची भावना व्यक्त व्हावी, हीच कल्पना होती. आधुनिक जगातही आपल्या मुळांशी जोडून ठेवणारी ही वारली कला आमच्या सजावटीला वेगळी ओळख आणि मनाला भिडणारा पारंपरिक स्पर्श देऊन गेली.

Swapnasheela Patil, NJ

॥ श्री गणेशाय नमः ॥



Bappa's Blessings for a New Learning Journey 🚌📚🙏 This year's Ganpati decoration is especially close to our hearts. Our daughter began her educational journey this September, and we wanted to make this milestone memorable with Bappa's blessings. We chose an Educational School Bus theme, symbolizing the beginning of her exciting journey of learning and discovery. The school bus, books, crayons, globe, pencils, and other educational elements were lovingly handmade and arranged as a family. For us, this decoration is more than an Aaras—it represents a parent's joy, our daughter's first step into the world of education, and our prayer that Bappa always guides her toward knowledge, curiosity, and success. 🙏❤️

Rahul Dadgale, WI

॥ श्री गणेशाय नमः ॥



दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आम्ही आमच्या घरी गणेशोत्सवानिमित्त गणपतीची स्थापना केली. उत्सवाच्या तयारीदरम्यान बाप्पाच्या आरासीसाठी कैलास पर्वताचे दृश्य साकारण्याचे सर्वानुमते ठरले. यासाठी माझी मुलगी पिहू हिने जीव ओतून काम केले. मी तिला कार्डबोर्डला शिवपिंडीचा आकार देण्यासाठी मदत केली.
एका बाजूला "वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ" तर दुसऱ्या बाजूला "सर्वकार्येषु सर्वदा" हे श्लोक सुवाच्य अक्षरांत बसवले. पार्श्वभूमीवर हिमालयाच्या पर्वतरांगा, बर्फाच्छादित शिखरांसाठी कापूस व बर्फाच्या नद्यांचे ओहळ साकारून कैलास पर्वतावरील शिवशंभूंचे निवासस्थान दर्शवले.
या प्रसन्न वातावरणात गणेश चतुर्थीला बाप्पांची विधिवत स्थापना केली. पुढील दहा दिवस नियमित पूजा करून अनंत चतुर्दशीला निरोप देण्याचा आमचा निर्धार आहे. गणपती बाप्पा मोरया!
सौ. पल्लवी राहुल ददगाळे, ब्रुकफिल्ड, मिलवाकी

Shraddha Ravindra Tambe , OR

॥ श्री गणेशाय नमः ॥



मोरपिसाचे रंगच किती सुंदर असतात ना... 💙💚 प्रत्येक वेळी मोरपिस पाहिलं की त्याचे ते निळे, हिरवे आणि सोनेरी रंग मनाला खूप भावतात. 🦚✨
याच सुंदर रंगांची कल्पना मनात ठेवून यावेळची आमची गणपतीची आरास करण्याचा विचार केला. आणि या आरासेची खास गोष्ट म्हणजे Crepe paper roll करण्याची कल्पना आमच्या मुलीची! 🥰 तिच्या छोट्या छोट्या craft ideas आणि आमच्या कल्पना एकत्र करून ही आरास तयार केली. तिच्या कल्पनेला प्रत्यक्ष रूप देताना केलेली ही छोटीशी creative journey आमच्यासाठी खूप खास होती. ❤️ आमच्या छोट्या कलाकाराच्या कल्पनेतून आणि प्रेमातून साकारलेली ही मोरपिसाच्या रंगांची गणपतीची आरास... 🦚🙏💙

Manish Ashok Kelji, TX

॥ श्री गणेशाय नमः ॥



I come from Kokan and Ganpati is special festivel their, in our village we have our own wada and its made of red soil, i tried to depict same kokani vada to my kids, where I grew up. I try to celebrate ganpati with kokan tradition, so the next generation will also learn the same.

Arjunsing Ramsing Patil and Shital Arjunsing Patil ॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाच्या गौरी-गणपती उत्सवासाठी आम्ही जेजुरीच्या गडाचा देखावा साकारला असून, श्री खंडोबाच्या भक्तीपरंपरेचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न केला आहे. यंदाच्या उत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गौरींना बाणू आणि म्हाळसा यांच्या रूपात सजवण्यात आले आहे. पारंपरिक वेशभूषा, दागदागिने आणि अलंकारांनी सजलेल्या गौरींच्या या स्वरूपातून महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचे दर्शन घडवण्यात आले आहे.

Pravin Bobade, WA

॥ श्री गणेशाय नमः ॥



अमेरिकेच्या भूमीत बाप्पाच्या भक्तीची १२ वर्षे आनंदाने पूर्ण करताना यंदाची 'दिव्य व सात्विक' आरास मनाला असीम शांती देणारी ठरली. अष्टविनायक कोरलेले पवित्र आसन आणि मोहक रेशमी वस्त्रांतील आपले तेजोमय बाप्पा सर्वांचे मन मोहतात. पांढरे-लॅव्हेंडर पडदे, सुंदर झूमर, समया, कृत्रिम फुले, फिरणारे कमळ व पितळी हत्तीने मंडप उजळला. लेकरांच्या गोड सहभागाने दहीच्या डब्यांची सुंदर DIY कलाकुसर, सुरेख रांगोळी अन् फुलांनी व फ्लोटिंग कॅन्डलने सजलेली 'उरळी' शोभा वाढवते. घरगुती मोदक-लाडू, रोजची सात्विक आरती आणि बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या आप्तेष्टांच्या आनंदी संगतीत हा गोड सोहळा परिपूर्ण झाला!

Kavita Atul Rajmane, SK

॥ श्री गणेशाय नमः ॥



आमच्या आरासेची संकल्पना “पंढरीची वारी – भक्तीचा प्रवास” या विषयावर आधारित आहे. विठ्ठल-रुक्मिणीची भक्ती, वारकरी परंपरा, संतपरंपरा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे दर्शन आरासेतून घडवण्याचा प्रयत्न केला आहे. पंढरपूरचे मंदिर, वारी, वारकरी, पालखी आणि ग्रामीण जीवन लघुरूपात साकारले आहे. या आरासेत आमच्या मुलांनीही त्यांची सर्जनशीलता व तांत्रिक कौशल्य दाखवले आहे. मोठ्या मुलांनी Robotics मधील साहित्य वापरून कार्यरत ट्रॅफिक सिग्नल तयार केला, तर छोट्या मुलांनी LEGO च्या साहाय्याने पंढरपूरचे प्रवेशद्वार (कमानी) साकारले. भक्ती, संस्कृती आणि मुलांच्या कल्पकतेचा हा सुंदर संगम आमच्यासाठी खास आहे.

Dr. Swati Savvee

॥ श्री गणेशाय नमः ॥



यंदाची आमची आरास महाराष्ट्रातील पारंपरिक आणि पवित्र अष्टविनायक देवस्थान ह्या वर आधारित आहे. जेव्हा गणपती बाप्पा घरी येतात, तेव्हा ते आपल्यासोबत आनंद, भक्ती आणि एकतेचे वातावरण घेऊन येतात. ह्या वर्षी आम्ही आमच्या नवीन घरात आलो - ह्या वर्षी आम्हची गणपती ची मूर्ती श्रीमंत दगडू शेठ चे सुंदर प्रतीक होते, आणि नवीन घरातले बाप्पाचे पाहीले वर्ष, त्यामुळे त्याचे भरभरून आशीर्वाद मिळणे महत्वाचे होते. आमच्या नवीन घरात एका नवीन अध्यायाची सुरुवात करताना, आम्ही सुख, आरोग्य, समृद्धी आणि सलोख्यासाठी सर्व आठ अष्टविनायक देवतांचे आशीर्वाद मागितला आणि आह्मी आरास म्हणून स्वयंभू अष्टविनायक मंदिराची संकल्पना निवडली -आशीर्वाद मागितला कि आमचे सगळे संकल्प सिद्धी कर.

Jaykumar Appaso Chaundkar

॥ श्री गणेशाय नमः ॥



पंढरीची वारी, बाप्पाची स्वारी ✨🙏 यावर्षी भक्तीच्या रंगात पंढरीचा पांडुरंग साकारण्याचा विचार केला. पांडुरंग, वारकरी, विठ्ठल-रखुमाई आणि तुळशी वृंदावनातून आमच्या छोट्याशा घरात पंढरीची वारीच अनुभवली. अमेरिकेत राहूनही आपल्या मातीशी, संस्कृतीशी आणि परंपरांशी असलेलं नातं जपण्याचा हा मनापासून केलेला छोटासा प्रयत्न. 🇮🇳❤️🇺🇸 परंपरा फक्त जपायच्या नसतात, तर पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायच्या असतात. आपला इतिहास, श्रद्धा आणि संस्कृती त्यांनी जाणून घ्यावी, अनुभवावी आणि अभिमानाने पुढे न्यावी, हीच मनापासून इच्छा.

Neha Pednekar, MA

॥ श्री गणेशाय नमः ॥



कमळ हे पवित्रता, सौंदर्य, सकारात्मकता आणि समृद्धीचे प्रतीक आहे. याच संकल्पनेतून बाप्पासाठी हे भव्य गुलाबी कमळ मी स्वतः थर्माकोलपासून तयार केले. प्रत्येक पाकळीला हाताने आकार देऊन रंगवले आणि मागील बाजूस प्रकाशयोजना करून आकर्षक 3D प्रभाव निर्माण केला. गुलाबी-पांढऱ्या फुलांची सजावट, पारंपरिक कमळाच्या आकारातील लटकन, समया आणि सौम्य रोषणाईमुळे संपूर्ण आरास प्रसन्न व भक्तिमय झाली. आधुनिक कल्पकता आणि पारंपरिक गणेशोत्सवाची भावना यांचा सुंदर संगम साधण्याचा हा प्रयत्न आहे. बाप्पाच्या आगमनाने घरात आनंद, शांती, सकारात्मकता आणि समृद्धी नांदो, हीच या आरासेमागची मनापासून भावना आहे.

Prachi Deogaonkar, NJ

॥ श्री गणेशाय नमः ॥



ह्या वर्षी आम्ही गणपतीची आरास म्हणून बाप्पासाठी पुष्पमहाल बनवले. लाकडाचे सुंदर खांब जोडून देवळासारखा महाल घरी तयार केला. त्याला लाल आणि गुलाबी अशी फुले चिकटवली. नंतर त्याला लाइटच्या माळा लावल्या. मग त्याच्यामागे गाई आणि केळीची खांब असलेला एक पडदा लावला. त्यावरदेखील लाइट च्या माळा आणि झेंडूची तोरणे लावली. आजूबाजूला फुलांनी आणि अंगणातल्या झेंडूने अजूनच शोभा आली. दोन बाजूला हत्ती ठेवले. त्यावर नारळ, फुलांची व फळांची आरास मांडली. नक्षीदार दिवे, कलश,ताम्हण पळीपंचपत्र, विड्याची पाने सुपाऱ्या ठेवल्या. परंतु जेव्हा महालात बाप्पा आले तेव्हा खऱ्या अर्थाने महालाला वेगळेच तेज आले. ह्या सगळ्यात माझ्या दोन मुलींनीसुद्धा जुंपून आनंदाने मदत केली.

Ashish Bodhe , VR

॥ श्री गणेशाय नमः ॥



When the festival arrived, the heart of our celebration wasn't store-bought; it was built from scratch with our own hands. We set out to recreate the magnificent mahadwar of the Tulja Bhavani Mandir, transforming humble cardboard and thermocol sheets into towering stone-like pillars and intricate arches. Every single detail was a shared act of devotion. We meticulously sculpted the goddess and her traditional temple jewelry by hand, layering textures, foil, and gold paint to capture her royal radiance. Standing proudly at the entrance of our home, the handmade gateway glowed beneath warm fairy lights—not just as a monument of art, but as a true reflection of our community's creativity, patience, and unwavering faith.

Vaibhavi Rajderkar

॥ श्री गणेशाय नमः ॥



पंढरपूरची वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि दैदीप्यमान सोहळा आहे. वारीची परंपरा ८०० वर्षांपेक्षाही जुनी आहे. आषाढी एकादशीला सर्व वारकरी चंद्रभागा नदीत पवित्र स्नान करून विठू माऊलीचे दर्शन घेतात. अमेरिकेत असल्याने वारी चा अनुभव मराठी मंडळ मधून नेहमी अनुभवतो पण तरी पंढरपुरची वारी करायची इच्छा असल्याने देखाव्यात साकारण्याचा एक प्रयत्न.

Manjari Kulkarni

॥ श्री गणेशाय नमः ॥



आमच्या कुटुंबात गणपती उत्सव ५ दिवस साजरा करतो, बाप्पासाठी काय आरास करायची, ह्याची मज्जा मी माझ्या लहानपणापासून पाहिली आणि केली आहे, ह्याचे श्रेय माझ्या आईला जाते. आदल्या रात्री १२ पर्यंत आरास करायची त्याची मज्जा काही वेगळीच! आरास करताना सर्व कुटुंबीयांच्या सहभागामुळे त्याला एक वेगळाच सुरेख रूप येतं. या वेळी आम्ही 'वल्लरी(वेल)' ही थीम केली आणि मला तुकारामांचा अभंग 'वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें' आठवला. रंगीत पेपर,दोरी आणि बांबूच्या काड्या हे साहित्य वापरून आम्ही ही पर्यावरणपूरक आरास केली. या वेलीवर रंगीबेरंगी फुलपाखरू 🦋 लावायची कल्पना माझ्या मुलीची! चला तर मग, हा वारसा पुढच्या पिढीकडे गेला म्हणायचा!" गणपती बाप्पा मोरया!"

Amruta Gite

॥ श्री गणेशाय नमः ॥



Our family handcrafted this mosaic mirror art shrine(Sheesh Mahal) from scratch. The archway features intricate twin peacocks and a lotus. It was a true collaboration. Our 8- and 10-year-old daughters spent hours with us gluing the pieces, applying the acrylic grout filling, and carefully cleaning the mirrors. This elegant backdrop houses our Ganesha idol, surrounded by diyas, fresh flowers, and handmade modak. We are proud of this family achievement celebrating our devotion and shared craftsmanship.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उपक्रम — BMM उपक्रम

कार्यक्रम, अधिवेशन आणि गौरव

कलाकार, अधिवेशन, पुरस्कार आणि युवकांसाठी शिष्यवृत्ती

स्थानिक कार्यक्रम
NA PROGRAMMING

उत्तर अमेरिकेतील मराठी कलाकारांचे कार्यक्रम विविध मंडळांपर्यंत पोहोचवणे. स्थानिक प्रतिभेला व्यासपीठ.

/nap

भारतीय कार्यक्रम
INDIA PROGRAMMING

महाराष्ट्रातील कलाकारांचे कार्यक्रम उत्तर अमेरिकेतील मंडळांपर्यंत पोहोचवणे.

/india-programming

BMM 2026 सिएटल
CONVENTION

BMM चे द्वैवार्षिक अधिवेशन — उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाचा सर्वात मोठा सांस्कृतिक सोहळा.

/bmm2026

BMM पुरस्कार
AWARDS

समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा BMM तर्फे गौरव.

/bmm_awards

युवा शिष्यवृत्ती
YOUTH SCHOLARSHIP

गुणवंत मराठी युवकांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणारी BMM शिष्यवृत्ती.

/bmm_youth_scholarship

पुस्तक प्रकाशन
BOOK PUBLICATION

मराठी लेखकांच्या साहित्याला BMM तर्फे प्रकाशनाचे व्यासपीठ.

/bmm_book_pubication

BMM हेल्पलाइन
गरजेच्या वेळी मदतीसाठी · /adhar

BMM YouTube
सर्व सत्रे व कार्यक्रम · @bmmyoutube

भारतात जाताय?
BMM BVG ऑफर्स · /bvg

PVSA
President's Volunteer Service Award मार्गदर्शक

BMM ला पाठबळ द्या

यातील बहुतेक उपक्रम मोफत आहेत. प्रशासकीय खर्चासाठी आपल्या **सढळ देणगीचे** स्वागत आहे. देणगीसाठी QR स्कॅन करा.

Rasika Vaidya and Kaiwalya Telang

॥ श्री गणेशाय नमः ॥



आमच्यासाठी बाप्पाची आरास म्हणजे केवळ सजावट नाही, तर बाप्पाने दिलेल्या सुंदर आठवणींबद्दलची कृतज्ञता. ❤️ईशान आमच्या आयुष्यात आला त्या वर्षी त्याच्या बाबागाडीची आरास केली. अमेरिकेत पहिलं घर घेतलं, तेव्हा आमच्या घराची छोटी प्रतिकृती साकारली. ईशान पहिल्यांदा शनिवारवाड्याला गेला, तेव्हा शनिवारवाडा आरासीत उभा केला. यावर्षीची आठवण मात्र मनाच्या अगदी जवळची आहे. अनेक वर्षांच्या गुडघेदुखीमुळे बाबा चालू शकत नव्हते आणि शस्त्रक्रियेसाठी तयार नव्हते. मनात होतं—बाबांसोबत फिरण्याची, त्यांना न्यूयॉर्क आणि नायगारा दाखवण्याची संधी कदाचित फक्त एक-दोन वर्षांची असेल. म्हणून ईशानसोबत त्यांना घेऊन हा प्रवास केला. यावर्षीची आरास त्या प्रवासाची आणि त्या अनमोल आठवणींची—बाप्पाला कृतज्ञतेने अर्पण. ❤️🙏

Radhika Rohit Marathe

॥ श्री गणेशाय नमः ॥



यावर्षी गणपतीच्या आरासासाठी मी महाराष्ट्राच्या परंपरेशी नाते सांगणारी वारली कला निवडली. कमी वेळेत साधी, सुबक, आकर्षक आणि अर्थपूर्ण सजावट करण्याचा माझा प्रयत्न होता. वारली चित्रांमधील निसर्ग, दैनंदिन जीवन, उत्सव आणि लोककथा मला विशेष भावतात. आरासेला मातीसारखा नैसर्गिक पोत मिळावा म्हणून रंगात रवा मिसळला. सुरुवातीला हात थरथरत होते आणि रेषा चुकत होत्या; तरी देवाचे नाव घेऊन पहिली पांढरी रेषा काढली. हळूहळू आत्मविश्वास वाढला, रेषा जोडल्या गेल्या आणि चित्र आकार घेत गेले. प्रत्येक आकृतीतून साधेपणा, परंपरा आणि भक्ती व्यक्त झाली. अखेरीस गणरायासाठी साकारलेली ही वारली आरास मातीतला स्पर्श, कलात्मक सौंदर्य आणि मनातील श्रद्धा यांचा सुंदर संगम ठरली; तिचे समाधान मनात दीर्घकाळ राहील.

आमच्याशी जोडलेले राहा!

@BMM.NorthAmerica

Instagram

Scan QR code from Mobile

WhatsApp Channel

Scan QR code from Mobile

Facebook Group

Scan QR code from Mobile

वेबसाइट · Website

Scan QR code from Mobile

Omkar & Swapnali Pathak

॥ श्री गणेशाय नमः ॥



मागच्या वर्षी आम्ही आरास म्हणून छोटं गाव बनवलं होतं, त्यात छोटी पण functional विहीर बनवण्याचा अनुभव असल्यामुळे तीच कल्पना पुढे नेऊन यावेळी धबधबा बनवू असं स्वप्नालीला वाटत होतं. मागच्याच महिन्यात कॅलिफोर्नियाला जाऊन आल्यामुळे Yosemite मधले डोंगरही डोक्यात होते. मग दोन्ही एकत्र करून डोंगरांच्या मधून कोसळणारा धबधबा, शेजारी बाप्पा आणि पायथ्याशी छोटंसं गाव अशी कल्पना आकारास आली. डोंगर बनवताना Yosemite प्रमाणे Granite च्या रंगाचे न बनवता सह्याद्रीप्रमाणे काळे/करडे बनवले. यावेळी मदतीला मित्र नसल्याने स्वप्नाली, मी आणि मोठी मुलगी स्पृहा २ आठवडे यासाठी काम करत होतो, पण कष्टांचं चीज झालं असं सगळ्यांच्या प्रतिक्रिया बघून वाटलं. छोटी मुलगी पृथा हिला पाण्याची आवड असल्यामुळे तिलाही आनंद होताच. तुम्हालाही सगळ्यांना आम्ही केलेली आरास आवडेल ही अपेक्षा !

Mrs.Mugdha Anand Deshpande

॥ श्री गणेशाय नमः ॥



आमचा बाप्पा मला गणपती बाप्पा प्रचंड आवडतो, त्याच्यावर मनापासून श्रद्धा आणि खूप जास्त प्रेम देखील आहे. त्यात आमचा बाप्पा तर अजूनच खास कारण तो आमच्या मुलांसाठी खूप हौशीने बसवलेला हौशीचा बाप्पा आहे. परदेशात राहून मुलांना गणपती उत्सव कळवा आणि त्यांना पण बाप्पा हा फक्त बुद्धीची देवता नसून आपल्या घरातलाच एक प्रेमळ सदस्य आहे असे वाटावे असे खूप वाटते. म्हणून आम्ही सगळे दरवर्षी छानशी आरास करतो. खरं सांगायचे झाले तर भारतात राहून आपल्याला मुलांना वेगळ्यानी अष्टविनायक म्हणजे काय? किंवा त्यांचे महत्व काय? हे शिकवावे लागत नाही, पण इथेही त्यांना ह्या गोष्टी कळाव्यात असे वाटले म्हणून आम्ही केलेला हा एक छोटा प्रयत्न! एकूणच काय बाप्पावरची श्रद्धा, त्याच्या आठही गोंडस आणि साध्या रूपांवरील प्रेम आणि decoration च्या निमित्तानी मुलांना देखील अष्टविनायका बद्दल माहिती मिळेल ह्या happy thoughts नी आम्ही ह्या वर्षी अष्टविनायक हि आरास केली. आणि हीच आहे आमची ह्या वर्षीच्या decoration मागील गोष्ट!

Pallavi Hemant Mane, CA

॥ श्री गणेशाय नमः ॥



यावर्षीची आमची गणपती सजावट छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्याच्या गौरवशाली वारशाला समर्पित आहे. या सजावटीच्या केंद्रस्थानी आहे "भक्ती-शक्ती" ही सुंदर संकल्पना — संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज. संत तुकाराम महाराज म्हणजे भक्ती — श्रद्धा, अध्यात्म आणि सद्विचार; तर छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे शक्ती — शौर्य, नेतृत्व आणि स्वराज्याची प्रेरणा. भक्ती आणि शक्ती यांचा हा सुंदर संगम आपल्या संस्कृतीतील मूल्य आणि सामर्थ्य यांचे प्रतीक आहे.



Saanvi Maindalkar



Sheetal Shishir Patil



Vaishali Shimpi



Sagar Parab



Mrunali Kulkarni



Kedar Kunchur



Mugdha Muley



Snighdha Pande



Chaitrali Chandorkar



Makarand Deolalkar



Asmita Pingale



Sarika Hogade



Shruti Tekale



Deepa kulkarni



Vaibhav Kachare



Shraddha Jagtap

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उपक्रम — BMM उपक्रम

कार्यक्रम, अधिवेशन आणि गौरव

कलाकार, अधिवेशन, पुरस्कार आणि युवकांसाठी शिष्यवृत्ती

स्थानिक कार्यक्रम
NA PROGRAMMING

उत्तर अमेरिकेतील मराठी कलाकारांचे कार्यक्रम विविध मंडळांपर्यंत पोहोचवणे. स्थानिक प्रतिभेला व्यासपीठ.

/nap

भारतीय कार्यक्रम
INDIA PROGRAMMING

महाराष्ट्रातील कलाकारांचे कार्यक्रम उत्तर अमेरिकेतील मंडळांपर्यंत पोहोचवणे.

/india-programming

BMM 2026 सिएटल
CONVENTION

BMM चे द्वैवार्षिक अधिवेशन — उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाचा सर्वात मोठा सांस्कृतिक सोहळा.

/bmm2026

BMM पुरस्कार
AWARDS

समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा BMM तर्फे गौरव.

/bmm_awards

युवा शिष्यवृत्ती
YOUTH SCHOLARSHIP

गुणवंत मराठी युवकांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणारी BMM शिष्यवृत्ती.

/bmm_youth_scholarship

पुस्तक प्रकाशन
BOOK PUBLICATION

मराठी लेखकांच्या साहित्याला BMM तर्फे प्रकाशनाचे व्यासपीठ.

/bmm_book_pubication

BMM हेल्पलाइन
गरजेच्या वेळी मदतीसाठी · /adhar


BMM YouTube
सर्व सत्रे व कार्यक्रम · @bmmyoutube

भारतात जाताय?
BMM BVG ऑफर्स · /bvg

PVSA
President's Volunteer Service Award मार्गदर्शक

BMM ला पाठबळ द्या

यातील बहुतेक उपक्रम मोफत आहेत. प्रशासकीय खर्चासाठी आपल्या **सढळ देणगीचे** स्वागत आहे. देणगीसाठी QR स्कॅन करा.



Shilpa Joshi



Abhiruchi Shinde



Supriya Patwardhan



Vanita Wangade



Neha Nanvati



Swati Jangam



Kedar Gokhale



Pooja Chetan



Sadhana Patil



Sandeep Kasurde



Ashwini Nikam



Amruta Paricharak



Supriya Kosare



Milind Naik



Manjiri Khare



Sonia Gadhave



Kalpana Godse



Vikrant Tonape



Dimple Chaudhari



Vikram Jagadale



Vaishali Mali



Reshma Gaikwad



Dr Swati Gite



Vidya Bhadane



Sandip Pawar - Calgary



Ashok Jadhav - Canada



Dimple Chaudhari



Jyotsna Maid



Harshada Bhave & Shantanu Kulkarni



Priya Surse - Aher



Pushkaraj Kasture & Family



Livingstonecha Raja NJ



Prajakta Badgujar



Rupamati Salunkhe



Swati Kinkar - Calgary



Sailee Deshpande

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उपक्रम नाती आणि व्यवसाय

जोडणारे दुवे

जीवनसाथी शोधण्यापासून करिअर आणि व्यवसायापर्यंत — BMM समाजाला जोडते

रेशीमगाठी RESHIMGATHEE · MATRIMONIAL

Our Story, Your Love

उत्तर अमेरिकेत जन्मलेल्या, वाढलेल्या किंवा शिक्षण-नोकरीसाठी आलेल्या मराठी तरुण-तरुणींसाठी जीवनसाथी शोधण्याचे BMM चे विश्वासार्ह व्यासपीठ. समान सांस्कृतिक व सामाजिक मूल्ये जपणाऱ्या जोडीदाराशी ओळख घडवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

- reshimgathee.bmmonline.org वर नोंदणी आणि माहितीची देवाणघेवाण
- विविध शहरांत सभासदांसाठी प्रत्यक्ष भेटीचे मेळावे
- परंपरा जपणाऱ्या, पण आधुनिक विचारांच्या मराठी समाजासाठी

वेबसाइटला भेट द्या

उल्का नगरकर
ulka.nagarkar@bmmonline.org

व्यवसाय · B-Connect EMPOWERING CONNECTIONS

Let's connect. Let's grow.

उद्योजक, व्यावसायिक, विद्यार्थी आणि तज्ज्ञांना एकाच व्यासपीठावर आणणारा BMM चा समुदायाधारित उपक्रम. संपर्क, सहकार्य आणि एकमेकांच्या साथीने व्यवसाय आणि समाज दोघांची प्रगती हे B-Connect चे सूत्र.

- बिझनेस नेटवर्किंग, मार्गदर्शन (mentorship) आणि उद्योजकता सहाय्य
- विद्यार्थ्यांसाठी करिअर तयारी, इंटर्नशिप आणि व्यावसायिक नेटवर्क
- करिअर पोर्टल: नोकरी शोधणारे आणि नियोक्ते यांची थेट जोडणी
- Second Orbit, AI Summit सारखे विशेष कार्यक्रम

bmmonline.org/bconnect

संदीप पवार
sandip.pawar@bmmonline.org




Arvind Waghmare




Abhijit Patil




Vasundhara Fegade



Vivek Kumar



Kalpana Gadewar



Pravin Tabme



Anupriya Kendre



Vinod Pawar



Mandar Kelkar



Varada Dandekar



Pallavi



Preeti Gendapwar



Aarati Bhagwat



Bhushan Kini



Priti Kant



Janaki Joshi



Pranita Hande



Deepa kulkarni



Kirti Teredesai



Reena Chavan



Rakesh Kolapkar



Poonam Shirwalkar



Arti Jagajampi



Dheeraj Birajdar



Avanti Vihite



Amruta Joglekar



Pradnya Kale




Sachin Tekale



Vinod & Bhakti Patil



Sonali Dhapale Raut



Vijaykumar Mehtre



Sagar Patil



Vandana Pitke



Purnima Kulkarni



Vinita Kotnis



Shubhada Savargaonkar



Sachin Kadam



Yamini Bobde



Sapana Telavane



Ketaki Ketan Vishe



Harshada Patil



Supriya Galgale



Ketaki Natekar



Shubhangi Kashmire



Samidha Vartak



Maithili Kadam




Rupa Halle



Amruta Bhat



Neha Kulkarni



Sameer Jadhav



Samir Sathe



Ashwini Vaidya



Niyant Kulkarni



Jaee Potade



Samidha Vartak



Pramod Rasal



Ravi Chamale



Manasi Rakshe



Satish Gowdra



Chetana Talware



Sudnesh Bhokare



Apeksha Labde



Prajakta Chavan



Bhosale Family



Harshawardhan Bhosale



Pravin & Aditi Bijwe



Gauri Kadam



Pallavi Mahajan



Aniket Katkar



Asawari Korde



Swara Sawarkar



Neeta Gore



Roopa Matole



Rakesh Kolapkar



सार्वजनिक गणेशउत्सव

निसर्गाच्या सानिध्यात , पर्यावरण पूर्वक साहित्यातून साकारलेले बाप्पा



Maayboli Melawa Tampa Bay Ganesh Utsav

Maayboli Melawa Tampa Bay Ganesh Utsav

Founded in 2001 by a passionate group of Marathi culture enthusiasts, Maayboli Melawa Tampa Bay (MMTB) was created to provide a home away from home for the Marathi community in the Greater Tampa Bay area. Since its early years, Ganesh Chaturthi has remained one of MMTB's most cherished celebrations, bringing families together through devotion, aarti, traditional music, cultural programs, and prasad.

As MMTB approaches its 25th anniversary in 2026, its mission remains as meaningful as ever: to offer a vibrant platform for cultural exchange while bridging Maharashtra's rich heritage with the diverse American landscape. Through these celebrations, MMTB continues to preserve traditions, nurture community connections, and pass Marathi culture on to future generations.



Central Valley Marathi Mandal (CVMM), California

माऊंटन हाऊस, कॅलिफोर्निया – १९ सप्टेंबर २०२६: Central Valley Marathi Mandal (CVMM) तर्फे आयोजित CVMM Grand Ganesh Utsav शनिवार, १९ सप्टेंबर रोजी Mountain House येथील Central Park मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वांसाठी मोफत असलेल्या या उत्सवाला Mountain House तसेच आजूबाजूच्या शहरांमधून मोठ्या संख्येने कुटुंबे आणि समुदायातील नागरिक उपस्थित होते. भक्ती, संस्कृती, संगीत, खाद्यपदार्थ, खरेदी आणि सामुदायिक उत्साहाने संपूर्ण परिसर भारून गेला होता. उपस्थितांनी बाप्पाचे दर्शन व प्रसाद घेतला, स्थानिक कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम अनुभवले तसेच विविध खाद्यपदार्थ आणि खरेदीच्या स्टॉल्सचा आनंद घेतला. यावर्षीच्या उत्सवाचे एक प्रमुख आकर्षण होते CVMM Lezim Pathak. लेझीमच्या पारंपरिक आणि जोशपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर ढोल-ताशांच्या दमदार तालावर संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आणि अनेकांनी ढोल-ताशांच्या तालावर मनसोक्त नृत्याचा आनंद घेतला.

CVMM च्या गणेशोत्सवातील एक विशेष आणि भावनिक परंपरा म्हणजे Volunteers Appreciation Dance. बाप्पाच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी CVMM चे स्वयंसेवक एकत्र येऊन विशेष नृत्य सादर करतात. उत्सव यशस्वी करण्यासाठी पडद्यामागे अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व स्वयंसेवकांना मानाचा मुजरा करण्याचा हा एक सुंदर उपक्रम आहे. या उत्सवाने स्थानिक कलाकारांना आणि समुदायातील विविध गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. लहान मुलांपासून ते अनुभवी कलाकारांपर्यंत अनेकांनी आपली कला सादर केली आणि मोठ्या समुदायासमोर आपले कौशल्य दाखवले. उत्सवातील विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स हे देखील एक मोठे आकर्षण ठरले. विविध भारतीय पदार्थ आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांसोबतच कपडे, दागिने, भेटवस्तू, विशेष उत्पादने आणि इतर वस्तूंचे शॉपिंग स्टॉल्स देखील उपस्थित होते. या माध्यमातून स्थानिक व्यवसायांना आणि समुदायातील उद्योजकांना आपली उत्पादने सादर करण्याची तसेच उपस्थितांना त्यांना पाठिंबा देण्याची संधी मिळाली.

यावर्षीची आकर्षक गणपती सजावट "Golden Gate" या संकल्पनेवर आधारित होती. ही सुंदर सजावट CVMM च्या एका स्वयंसेवकाने आपल्या कल्पकतेने आणि मेहनतीने तयार केली होती. या सजावटीने उत्सवाच्या सौंदर्यात विशेष भर घातली. या संपूर्ण उत्सवात हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या तयारीपासून ते उत्सवाच्या दिवशी विविध जबाबदाऱ्या पार पाडण्यापर्यंत त्यांनी स्वयंसेवक म्हणून मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सहभागामुळे तरुण पिढीला समाजसेवा, जबाबदारी आणि समुदायाशी जोडले जाण्याचा अनुभव मिळाला. या उत्सवाला Mountain House शहर तसेच County मधील मान्यवर अधिकारी उपस्थित होते. Mountain House मध्ये असा सांस्कृतिक उत्सव आयोजित करून समुदायाला एकत्र आणल्याबद्दल CVMM ला County Supervisor Robert Rickman यांच्याकडून Certificate of Recognition प्रदान करण्यात आले. हा सन्मान संपूर्ण CVMM समुदायाच्या सामूहिक प्रयत्नांचा गौरव आहे.


दिवसभराच्या उत्साहपूर्ण कार्यक्रमाची सांगता भव्य गणेश विसर्जन मिरवणुकीने (Visarjan Miravnook) झाली. ढोल-ताशांचा गजर, नृत्य आणि "गणपती बाप्पा मोरया! पुढच्या वर्षी लवकर या!" या जयघोषात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले.

CVMM तर्फे या उत्सवाच्या यशासाठी योगदान देणाऱ्या सर्व स्वयंसेवक, CVMM कुटुंबे आणि मित्रपरिवार, देणगीदार, प्रायोजक, विक्रेते, कलाकार, हायस्कूल स्वयंसेवक आणि उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यात येत आहेत.

तसेच, इतर विविध समुदाय संस्था आणि समूहांनी दिलेल्या सहकार्याबद्दल CVMM विशेष आभारी आहे. त्यांच्या सहभागामुळे विविध पार्श्वभूमीतील लोकांना एकत्र आणून संस्कृती, परंपरा आणि समुदायभावना अधिक व्यापकपणे साजरी करता आली.

CVMM साठी हा गणेशोत्सव केवळ एका दिवसाचा उत्सव नाही. आपल्या सांस्कृतिक परंपरा जपणे, स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे, तरुण पिढीला सहभागी करून घेणे, स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि संपूर्ण Mountain House समुदायाला एकत्र आणणे, हा या उत्सवामागील व्यापक उद्देश आहे.

CVMM हा सुंदर सांस्कृतिक आणि सामुदायिक उपक्रम पुढेही असाच सुरू ठेवण्यासाठी कटिबद्ध आहे आणि पुढील वर्षी पुन्हा सर्वांचे स्वागत करण्यास उत्सुक आहे.



Baltimore Marathi Mandal

Baltimore Marathi Mandal - बाल्टिमोर मराठी मंडळ

आमच्या सजावटीची संकल्पना आहे "अमेरिकेच्या स्वातंत्र्याची 250 वर्षे आणि भारत-अमेरिका बंध". बलाढ्य गरुड हे अमेरिकेचे प्रतीक असून, त्यावर विराजमान श्री गणेश भारताच्या समृद्ध संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात - "गरुडा वर बैसोनी माझा कैवारी आला". कॅपिटल बिल्डिंग, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, राम मंदिर व इंडिया गेट या प्रतिष्ठित वास्तूंची प्रतिकृती एकत्र मांडून, दोन्ही देश आणि त्यांच्या संस्कृती संपूर्ण मानवतेला कशा प्रेमाने सामावून घेतात हे दर्शवले आहे. आणि खास आकर्षण — हलता देखावा! लहानपणीच्या गणेशोत्सवाच्या त्या जादुई आठवणी पुन्हा जिवंत करणारी प्रत्येक हालचाल... बालपणाकडे घेऊन जाणारा एक छोटासा, हृदयस्पर्शी प्रवास!





महाराष्ट्र मंडळ, लॉस एंजे लस (MMLA)

महाराष्ट्र मंडळ, लॉस एंजेलिस (MMLA) गणेशोत्सव

महाराष्ट्र मंडळ, लॉस एंजेलिस (MMLA) हे महाराष्ट्रातून आलेल्या मराठी भाषिक समाजाचे प्रतिनिधित्व करणारे मंडळ आहे. गेली ५० वर्षे मराठी संस्कृती, साहित्य आणि कला यांचा प्रसार आणि जतन करणे हे मंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मराठी संस्कृती जपण्यासाठी आणि ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी MMLA वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करते. संक्रांत, गणेशोत्सव, दिवाळी, श्रावण महोत्सव अशा अनेक सणांसोबतच लॉस एंजेलिस परिसरातील पाच ठिकाणी मराठी शाळा चालवल्या जातात. मराठी साहित्याची आवड वाढावी आणि साहित्याचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावा यासाठी मराठी पुस्तकांचे ग्रंथालयही चालवले जाते.

MMLA च्या माध्यमातून मराठी रंगभूमीवरील नामवंत कलाकारांना भारतातून लॉस एंजेलिस परिसरात आमंत्रित करून त्यांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याचबरोबर स्थानिक कलाकारांनाही नाटक, नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ दिले जाते. मराठी चित्रपटांसारख्या विविध कार्यक्रमांनाही मंडळाचा पाठिंबा असतो.

कला आणि साहित्याबरोबरच समाजातील लोकांनी एकमेकांशी जोडले जावे आणि आपले संबंध अधिक दृढ व्हावेत यासाठी MMLA तर्फे ट्रेकिंग, कॅम्पिंग, पिकनिक अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

वार्षिक गणेशोत्सव MMLA तर्फे दरवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. या उत्सवातील काही पारंपरिक कार्यक्रम: गणपती पूजा , अथर्वशीर्ष , महाआरती , गणपती दर्शन , महाप्रसाद , उत्तरपूजा , ढोल-ताशा , विसर्जन समाजातील सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि स्वयंसेवकांचे योगदान

MMLA गेली अनेक वर्षे गणेशोत्सव हा आपल्या प्रमुख वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमापैकी एक म्हणून साजरा करत आहे. MMLA च्या उपलब्ध जुन्या नोंदींनुसार, किमान २०१५ पासून गणेशोत्सवाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

MMLA चे कुटुंब

- २,००० पेक्षा जास्त सक्रिय सदस्य आणि मराठी समाजाशी जोडलेली कुटुंबे
- संपूर्ण ग्रेटर लॉस एंजेलिस परिसरात कार्य
- ५ ठिकाणी मराठी शाळा
- वर्षभर विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम

MMLA सध्या पाच ठिकाणी मराठी शाळा चालवते आणि वर्षभर विविध सांस्कृतिक व समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करते.

२०२६ गणेशोत्सव : यावर्षीचा गणेशोत्सव खालीलप्रमाणे साजरा करण्यात आला:

दिनांक: २० सप्टेंबर २०२६
स्थळ: BAPS श्री स्वामीनारायण मंदिर, चिनो हिल्स
वेळ: दुपारी ३:०० ते संध्याकाळी ७:००

कार्यक्रमामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होता:

- गणपती पूजा व अथर्वशीर्ष
- महाआरती
- गणपती दर्शन व महाप्रसाद
- उत्तरपूजा
- ढोल-ताशा व विसर्जन
- समाजातील सदस्यांचा सहभाग आणि स्वयंसेवकांचे योगदान

यावर्षीच्या गणेशोत्सवातही सर्वांनी एकत्र येऊन भक्तिभावाने गणरायाचे दर्शन घेतले आणि उत्साहात उत्सव साजरा केला. समाजातील अनेक सदस्य आणि स्वयंसेवकांनी उत्सवाच्या आयोजनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वांच्या सहकार्यामुळे हा गणेशोत्सव आनंद, भक्ती आणि एकोप्याच्या वातावरणात सुंदररीत्या पार पडला.



सॅन डिएगो महाराष्ट्र मंडळ

गणेशोत्सव जल्लोष २०२६ – संस्कृती, विविधता आणि एकजुटीचा उत्सव

सॅन डिएगो महाराष्ट्र मंडळ (SDMM) तर्फे शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी "गणेशोत्सव जल्लोष २०२६" मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यंदाच्या जल्लोषाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे हा उत्सव केवळ मराठी समाजापुरता मर्यादित न राहता, मराठी, अमराठी भारतीय तसेच अमेरिकन मित्र-परिवाराच्या उत्स्फूर्त सहभागामुळे खऱ्या अर्थाने बहुसांस्कृतिक सोहळा ठरला.

कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात गणपती बाप्पांच्या आगमनाने आणि महाआरतीने झाली. त्यानंतर रंगलेल्या "जल्लोष – विविध गुणदर्शन" कार्यक्रमात विविध वयोगटातील कलाकारांनी नृत्य, गायन, वादन आणि विविध कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. स्थानिक कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच, नवीन पिढीला आपल्या संस्कृती आणि परंपरांशी जोडण्याचा SDMM चा प्रयत्न या कार्यक्रमातून प्रकर्षाने जाणवला.

सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच SDMM तर्फे कार्यक्रमापूर्वी विविध ऑफलाइन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि जल्लोष २०२६ च्या व्यासपीठावर विजेत्यांची घोषणा करून त्यांचा गौरव करण्यात आला. विविध वयोगटातील सहभागी आणि त्यांच्या कुटुंबीयांचा उत्साह यामुळे या उपक्रमाला विशेष रंगत आली.

याच कार्यक्रमात BMM चे नवनियुक्त खजिनदार मिलिंद कुलकर्णी यांचा SDMM तर्फे विशेष सन्मान करण्यात आला. तसेच मराठी भाषा, संस्कृती आणि पुढील पिढीशी असलेले नाते अधिक दृढ करण्यासाठी योगदान देणाऱ्या 'परंपरा' उपक्रमाच्या संचालकांचाही विशेष गौरव करण्यात आला.

यंदाच्या जल्लोषाचे खास आकर्षण ठरले राजमुद्रा ध्वज पथक, लेझीम आणि SDMM राजमुद्रा ढोल-ताशा पथक. ध्वजाचा दिमाख, लेझीमचा पारंपरिक ठेका आणि ढोल-ताशांचा जोश यामुळे सॅन डिएगोमध्ये महाराष्ट्रातील गणेशोत्सवाची ऊर्जा अनुभवायला मिळाली. विशेष आनंदाची बाब म्हणजे या पारंपरिक सादरीकरणांचा अमराठी भारतीय आणि अमेरिकन उपस्थितांनीही मोठ्या उत्सुकतेने आणि उत्साहाने आनंद घेतला. अशा उपक्रमांमधून महाराष्ट्राची संस्कृती अधिक व्यापक समुदायापर्यंत पोहोचवण्याचा SDMM चा उद्देश अधिक दृढ झाला.

यंदाच्या गणेशोत्सवाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उत्सवाचा आनंद साजरा करताना स्थानिक परिसर आणि शेजारील रहिवाशांचा विचार करण्यावर SDMM ने विशेष भर दिला. पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम आणि मिरवणुकीचा उत्साह कायम ठेवतानाच आवाजाची पातळी मर्यादित ठेवण्यात आली आणि मिरवणुकीचा जास्तीत जास्त भाग कार्यक्रमासाठी आरक्षित अंतर्गत परिसरात आयोजित करण्यात आला. आपल्या परंपरेचा उत्साह जपत असतानाच आजूबाजूच्या परिसराला कोणताही अनावश्यक त्रास होऊ नये, याची विशेष काळजी घेण्यात आली.

जल्लोष २०२६ हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न राहता संपूर्ण समुदायाला एकत्र आणणारा उत्सव ठरला. स्वादिष्ट भोजनासोबतच विविध व्हेंडर स्टॉल्समुळे खरेदीची उत्तम संधी उपलब्ध झाली. स्थानिक व्यावसायिक आणि उद्योजकांना विविध समाजातील लोकांशी जोडण्यासाठीही या माध्यमातून एक चांगले व्यासपीठ मिळाले.

या भव्य सोहळ्याच्या यशामध्ये SDMM चे सर्व प्रायोजक, व्हेंडर पार्टनर्स, कलाकार, स्वयंसेवक आणि समाजातील विविध घटकांचे मोलाचे योगदान राहिले. कार्यक्रमस्थळी सुंदर आणि उत्सवी वातावरण निर्माण करण्यासाठी विशेष योगदान देणाऱ्या डेकोरेशन पार्टनर पूनम पवार यांचेही SDMM तर्फे मनःपूर्वक आभार. सर्व प्रायोजक आणि भागीदारांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम अधिक व्यापक आणि आकर्षक स्वरूपात साकारता आला.

या संपूर्ण जल्लोषामागे SDMM च्या उत्साही, समर्पित आणि मेहनती कमिटी टीमची मोठी ताकद उभी होती. कार्यक्रमाचे नियोजन, कलाकार आणि स्पर्धकांचा समन्वय, नोंदणी, भोजन व्यवस्था, स्टेज मॅनेजमेंट, सजावट, स्वयंसेवकांचे नियोजन, सोशल मीडिया, प्रसिद्धी आणि इतर अनेक पडद्यामागील जबाबदाऱ्या टीमने एकजुटीने सांभाळल्या. प्रत्येक सदस्याने आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या सांभाळत दिलेला वेळ आणि घेतलेली मेहनत ही या कार्यक्रमाच्या यशामागील महत्त्वाची बाब ठरली.

"विविधतेतून एकता" ही भावना यंदाच्या जल्लोषात विशेषत्वाने अनुभवायला मिळाली. मराठी कुटुंबांसोबतच अमराठी भारतीय आणि अमेरिकन मित्रांनीही गणेशोत्सवात सहभागी होत भारतीय आणि महाराष्ट्रीय संस्कृतीचा आनंद घेतला. भाषा आणि प्रादेशिक सीमांच्या पलीकडे जाऊन संस्कृतीच्या माध्यमातून विविध समुदायांना एकत्र आणण्याचा SDMM चा प्रयत्न या सोहळ्यातून सुंदरशीत्या साकार झाला.

"गणेशोत्सव जल्लोष २०२६" हा केवळ गणेशोत्सवाचा सोहळा नव्हता; तो महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अभिमान, विविध कलाकारांच्या प्रतिभेचा उत्सव, समाजातील विविध घटकांना जोडणारा एक सेतू आणि सॅन डिएगो समुदायाच्या एकजुटीचा सुंदर आविष्कार ठरला.



मराठी भाषिक मंडळ, एडमंटन, Canada

मराठी भाषिक मंडळ, एडमंटनयांच्या वतीने आयोजित गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, आपल्या मराठी संस्कृती, परंपरा आणि एकोप्याचा सुंदर उत्सव आहे.

परदेशात राहूनही आपल्या मातृभूमीशी आणि मातृभाषेशी असलेले नाते जपण्याची प्रेरणा गणराय आपल्याला देतो. श्री गणेशाचे आगमन म्हणजे आनंद, उत्साह, सकारात्मक ऊर्जा आणि नव्या संकल्पांची सुरुवात. गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध पिढ्यांना एकत्र आणणे, आपल्या मुलांना मराठी संस्कृतीची ओळख करून देणे, कला व परंपरांचे जतन करणे आणि समाजात आपुलकीचे बंध अधिक दृढ करणे, हेच या उत्सवाचे खरे सौंदर्य आहे.

“गणरायाच्या आगमनाने आनंद फुलू दे,
मराठी संस्कृतीचा सुगंध सर्वदूर दरवळू दे,
एकता, प्रेम आणि आपुलकीची ज्योत सदैव तेवत राहू दे!”

श्री गणेशाच्या चरणी प्रार्थना की, आपल्या सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि समाधान नांदो. आपल्या मंडळाची सांस्कृतिक वाटचाल अशीच उत्साहाने आणि एकजुटीने पुढे जात राहो.

गणपती बाप्पा मोरया!

मंगलमूर्ती मोरया!



शिकागो महाराष्ट्र मंडळ

साठ वर्षांची बाप्पाची कृपा!
शिकागो गणेशोत्सव २०२६

या वेळची नवलाई: कोकण थेट शिकागोत , शिकागो महाराष्ट्र मंडळाची एक खासियत आहे. कुणी म्हणतं, "किती छान होईल ना?" आणि मंडळ म्हणतं, "मग करूनच टाकूया!" मराठी माणसाच्या या वाक्यात कल्पना, उत्साह आणि थोडीशी जबाबदारी दुसऱ्याच्या खांद्यावर ठेवण्याची कला—सगळं असतं. निरभ्र आकाशाखाली नारळाची झाडं, तुळशी वृंदावन, रंगीबेरंगी पोशाख आणि गजबजलेला बाजार पाहून क्षणभर वाटलं—आपण शिकागोत आहोत की कोकणात? फक्त नारळ फोडायला परवानगीपत्र लागतंय की काय, एवढाच फरक! मुलांच्या आनंदी गोंधळाने उत्सवाला अगदी घरची चाहूल दिली.

३५ वर्षं समाजसेवा करणाऱ्या सतीशजींनी गणपती आणि गौरीची पूजा केली. आरती आणि मंत्रपुष्पांजलीच्या वेळी गप्पांचा वेगही मंदावला —हा स्वत:मध्ये एक आध्यात्मिक चमत्कारच! एका कोपऱ्यातून अनिताताई गोडबोले उत्सव पाहत होत्या. हा कदाचित त्यांचा साठावा शिकागो गणेशोत्सव! १९६६ मधला पहिला उत्सव आणि आज आनंदाने नाचणारी मुलं—यांना जोडणारा त्या एक जिवंत दुवा आहेत.

हसू बाई, जोरात!

मुलांचे कार्यक्रम आणि नृत्यांनी मन जिंकलं. जेवणाने उरलेलं सगळंच जिंकलं! वरणभात, फणसाची भाजी, मसालेभात, मोदक आणि गुलाबजाम... माझ्या अंतर्मनाने शांततेचा शोध सुरू केला आणि दुसरी वाढ घेतल्यावर तो ताबडतोब संपला. आहारतज्ज्ञांनी हे वाचू नये; किंवा वाचलं तर पुढच्या गणेशोत्सवापर्यंत विसरावं.

मग हसू बाई जोरातने पोटभर जेवणानंतरही पोट धरून हसायला लावलं. मुग्धा कुलकर्णी, रेणुका कुलकर्णी, अंजली किर्लोस्कर, अमेय परांजपे आणि चमूने वजन कमी करण्याचा ५१वा संकल्प, रिकामं झालेलं घर आणि मध्यमवयीन गोंधळ यांतून धमाल उभी केली. प्रेक्षकांनाही खेळात सामील केलं. स्वत:च्या सवयी रंगमंचावर दिसल्या की हसू जरा जास्तच येतं—कारण तेव्हा आपण प्रेक्षक नसतो, पुरावा असतो! मराठी माणूस सातासमुद्रापार जाईल; पण डाएट ठरवताना पुढच्या जेवणाची चर्चा सोडणार नाही.

भाईगिरी: मेड इन शिकागो!

"मेक इन अमेरिका"ची चर्चा सर्वत्र आहे; पण आमच्या कलाकारांनी एक पाऊल पुढे टाकलं—पु. लं.वरचं प्रेम मराठी, सादरीकरण मेड इन शिकागो! भाईगिरीने पु. ल. देशपांडे यांच्या विश्वाची सफर घडवली. रश्मी चाफेकर, उल्का नगरकर आणि कलाकारांनी त्यांचा विनोद, संगीत, नाटक, बालपण आणि कौटुंबिक आयुष्य सुंदरपणे गुंफलं.

सुनीताताईंच्या पत्राने मन हळवं झालं; गुळाचा गणपती आणि ती फुलराणीमधील क्षणांनी पु. लं.च्या कल्पनाशक्तीची पुन्हा आठवण करून दिली. निलेश जोशींचं "इंद्रायणी काठी" ऐकताना मन म्हणालं, "आज जाने की जिद ना करो!" पु. लं.च्या सहवासात नव्वद मिनिटं कशी पुरणार? त्यांच्यासोबत वेळही बहुधा तिकीट काढून बसला असावा.

घरी काय घेऊन आलो?
ढोलताशांच्या गजरात "गणपती बाप्पा मोरया!" म्हणत विसर्जनाची वेळ आली. या सोहळ्यामागे मेहनत घेणाऱ्या MMC टीममधील दीपाली सावंत चेतन रेगे, आशिष नगरकर, Ratnangi मालपेकर पल्लवी पाटील, मनीषा पंडित, प्रीती उंडाळे, अनिकेत सावंत आणि हृषीकेश घोडके, माधव गोगावले, MMC 2026 team , आणि BMM EC उल्का नगरकर यांचे मनापासून आभार.

सर्व कलाकार, भोजन समिती आणि पडद्यामागे धावणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाचेही आभार.

दरवर्षी बाप्पाला निरोप देतो; पण घरी परतताना हात रिकामे नसतात. सोबत असतं हास्य, मैत्री आणि आपल्या मुलांनाही अभिमानाने आपली म्हणता येईल अशी परंपरा. साठ वर्षं झाली, तरी पुढच्या वर्षाची उत्सुकता तितकीच ताजी आहे. फक्त एक प्रश्न कायम आहे— पुढच्या वर्षी मोदक किती खायचे? उत्तर अर्थातच: "बघू... परिस्थितीनुसार!"

गणपती बाप्पा मोरया! पुढच्या वर्षी लवकर या! "निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे..."



लिव्हिंगस्टनचा राजा, न्यू जर्सी

न्यू जर्सीतील मराठी आणि भारतीय समाजाला बाप्पाच्या निमित्ताने एकत्र आणावे आणि इथे वाढणाऱ्या पुढच्या पिढीलाही आपल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा जवळून अनुभवता यावी, या भावनेतून २०२५ मध्ये 'लिव्हिंगस्टनचा राजा' या सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

संस्थापक आणि अध्यक्ष प्रवीण बिजवे यांनी ही संकल्पना समाजासमोर मांडली. अनेक गणेशभक्त आणि उत्साही स्वयंसेवकांनी पुढे येऊन या उपक्रमाला मनापासून साथ दिली. सर्वांच्या सहभागातून आणि एकत्रित प्रयत्नांतून 'लिव्हिंगस्टनचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'ची सुरुवात झाली.

२०२५ मध्ये लिव्हिंगस्टन, न्यू जर्सी येथे बाप्पा पहिल्यांदा विराजमान झाला. पहिल्याच वर्षी १,००० हून अधिक भाविकांनी बाप्पाचे दर्शन घेतले. या उत्सवाला समाजाकडून मिळालेल्या भरभरून प्रतिसादामुळे २०२६ मध्ये गणेशोत्सव आणखी मोठ्या स्वरूपात साजरा झाला.

प्राणप्रतिष्ठा आणि आरतीने उत्सवाची मंगलमय सुरुवात होते. दिवसभर बाप्पाचे दर्शन, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम, लेझीम आणि ढोल-ताशाच्या गजराने वातावरण भारून जाते. संध्याकाळची महाआरती हे उत्सवाचे खास आकर्षण आहे. शेकडो भाविक एकत्र येऊन आरती करतात आणि त्या क्षणी न्यू जर्सीतही महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेशोत्सवाचा उत्साह अनुभवायला मिळतो.

या उत्सवाची खरी ताकद आहे ती समाजाच्या सहभागात. बाप्पाच्या आगमनापासून पूजा-अर्चा, आरती, महाआरती ते विसर्जनापर्यंत अनेक गणेशभक्त आणि स्वयंसेवक उत्साहाने सहभागी होतात. अमेरिकेत वाढणाऱ्या पुढच्या पिढीला बाप्पाची भक्ती, गणेशोत्सवाच्या परंपरा, एकत्र येण्याचा आनंद आणि सेवाभाव जवळून अनुभवता यावा, हाच मंडळाचा प्रयत्न आहे.

बाप्पाच्या आशीर्वादाने आणि सर्वांच्या साथीने 'लिव्हिंगस्टनचा राजा'चा हा प्रवास असाच पुढे सुरू राहो, हीच मनापासून इच्छा!

गणपती बाप्पा मोरया!











Marathi Bhashik Mandal Toronto, Canada

मिसिसागामध्ये MBM Toronto चा गणेशोत्सव उत्साहात

उत्तर अमेरिकेतील सर्वात जुन्या मराठी संस्थापैकी एक असलेले मराठी भाषिक मंडळ (MBM) Toronto पुढील वर्षी आपल्या गौरवशाली वाटचालीची ६० वर्षे पूर्ण करत आहे. गेली सहा दशके मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरांचा वारसा जपत, पिढ्यान्‌पिढ्या मराठी मनांना एकत्र आणण्याचे मोलाचे कार्य मंडळ अविरतपणे करत आले आहे.

यंदाचा गणेशोत्सव MBM Toronto तर्फे मिसिसागा येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. ५०० हून अधिक मराठी बांधवांनी उपस्थित राहून बाप्पाचे दर्शन घेतले आणि उत्सवाचा आनंद लुटला.
श्री गणेशाच्या विधिवत पूजनाने सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर झालेल्या सामूहिक अथर्वशीर्ष पठणाने वातावरण भक्तिरसाने भारून गेले. आरतीच्या मंगल स्वरांनंतर ढोल-ताशांच्या दणदणाटाने उत्सवात चैतन्य आणि जल्लोषाची भर पडली.

उत्सवात विविध विक्रेत्यांचे स्टॉल्सही होते. कार्यक्रमाच्या सांगतेला सर्व भाविकांनी बाप्पाच्या प्रसादाचा लाभ घेतला.

या सोहळ्याला MBM Toronto चे अध्यक्ष रोहन चुरी तसेच कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. भक्ती, परंपरा आणि मराठी संस्कृतीचा सुंदर मिलाफ घडवणारा हा गणेशोत्सव उपस्थितांसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला.










Utah Marathi Mandal










Pittsburgh Marathi Mandal





Orlando Marathi Mandal

ऑरलँडोचा गणपती राजा

ऑरलँडोमध्ये मराठी मंडळ आणि हिंदू सोसायटी यांचा संयुक्त गणेशोत्सव गणेश चतुर्थी पासून कधी ७ दिवस किंवा अगदी अनंत चतुर्दशीपर्यंत अक्षरश: दणक्यात साजरा होतो. जून - जुलैपासून सजावट, नृत्य - गायन- भजन इत्यादी कार्यक्रम, ढोल-ताशा पथक, पूजा, प्रसाद, लेझीम ग्रुप यांची आखणी आणि तयारी सुरू होते. पुलंच्या नारायणाच्या अंगात लग्न चढते तसे हळू हळू ऑरलँडोकरांच्या अंगात गणेशोत्सव चढतो.

गेली २५ किंवा त्याहून अधिक वर्षे ऑरलँडोच्या गणपतीला सजावट म्हणून theme असतेच. यंदा आग आणि धूर ओकणारा ज्वालामुखी, डोंगरावरून कोसळणारा धबधबा, आकाशाचा पडदा आणि पृथ्वीवर विराजमान झालेला पंचमहाभूतांच्या कोंदणातील बाप्पा असा आमचा देखावा आहे. ४ वेगवेगळ्या ठिकाणी, ४ गटांनी काम करून हा देखावा एकत्र उभा केला आहे.

गणेश चतुर्थीला संध्याकाळी ढोल-ताशे-लेझीमच्या ठेक्यावर पारंपरिक पद्धतीने रथातून बाप्पाची मिरवणूक काढली जाते. त्यानंतर सामूहिक पूजा, प्रतिष्ठापना आणि आरत्यांचा गजर होतो. मराठी लोक आणि इतर भारतीय मंडळी या सगळ्या समारंभात उत्साहाने सहभागी होतात. रात्री शेकडो लोक एकत्र प्रसाद - सहभोजन करतात.

त्यानंतर रोज संध्याकाळी, weekday असला तरी ५-६ कुटुंबे एकत्र येऊन हौशीने आरती करतात. त्या जोडीला भजनसंध्या, अथर्वशीर्ष आवर्तन वगैरे कार्यक्रमसुद्धा असतात. रोज काही ना काही कार्यक्रम किंवा आरती तरी हमखास असल्याने एक दिवसात गणेशोत्सव आटोपला, असे नाही. दिवसेंदिवस त्याची रंगत वाढतच जाते. आणि येतो गणेश विसर्जनाचा दिवस.

गणेश चतुर्थीला रथातून तर विसर्जनाच्या दिवशी, 'पायी हळू हळू चाला मुखाने गजानन बोला' म्हणत मंडळी पालखीतून बाप्पाला मिरवतात. मुली आणि स्त्रिया हमखास नऊवारी-नथ इत्यादी तर पुरुष धोतर फेटे पगडी अशी सगळी हौस पुरवून घेतात. १४ विद्या आणि ६४ कलांच्या या दैवताच्या चरणी, नृत्य -गायन- नाटिका- लहान मोठ्यांचे लेझीम नृत्य हा सगळा कलाविष्कार रुजू होतो. सगळ्या बाळगोपाळ मंडळींच्या हस्ते गणपतीची साग्रसंगीत पूजा होते. विसर्जनाच्या दिवशी लहान मुलांच्या हस्ते पूजा करून घेण्याची आता इथे परंपराच झाली आहे. ढोल ताशा पथकातही इथेच जन्मलेली - वाढलेली पिढी भरपूर सक्रिय आहे. ढोल ताशांच्या गजरात , बेभान होऊन मिरवणूकीत नाचत, पुढच्या वर्षी लवकर या म्हणत बाप्पाला निरोप देण्यात येतो. कधी देवळाच्या मागच्या तळ्यात किंवा हौदात सार्वजनिक आणि खाजगी गणपतींचे विसर्जन होते. पुन्हा एकदा शेकडो लोकांच्या सहभोजनानंतर, आवराआवरी नंतर, भारतापासून हजारो मैलावरच्या या कर्मभूमीत, आपापल्या परीने आपली परंपरा रुजवू बघणारे सगळेजण दमून भागून, पुन्हा एकदा लहान होऊन, नॉस्टॅल्जिक होऊन अतीव समाधानाने घरी परततात.

ऑरलँडोच्या देवळाची देखणी वास्तू आणि सभागृह, गणेशोत्सव आणि सगळेच सण-समारंभ साजरे करण्यासाठी आम्हाला लाभली आहे. भारताचे माजी राष्ट्रपती आदरणीय अब्दुल कलाम यांसह अनेक मान्यवरांनी आमच्या देवळाला भेट दिली आहे. भारतातून इथे आलेल्या कोणाहीसाठी, आपला माणूस भेटण्याची ही हमखास जागा आहे. टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाने कधीकाळी समाजाला एकत्र आणले. ऑरलँडोतील हे देऊळ आणि आमचा सार्वजनिक गणेशोत्सव आजही, मूळ घर सोडून परक्या भूमीत येऊन रुजलेल्या - रुळलेल्या सर्वांना घट्ट बांधून ठेवत आहे. गणपतीबाप्पा मोरया !













Ann Arbor Marathi Mandal

A2MM गणेशोत्सव 2026

कधी कधी आपल्या मातीपासून हजारो मैल दूर असलो, तरी एखादा ढोल-ताशांचा निनाद, "गणपती बाप्पा मोरया!"चा जयघोष किंवा उकडीच्या मोदकांचा सुगंध मनाला क्षणात मायभूमीत घेऊन जातो. असाच एक मंगल, आनंदमय आणि भावस्पर्शी अनुभव शनिवार, १९ सप्टेंबर रोजी Farmington High School येथे झालेल्या A2MM गणेशोत्सवात सर्वांनी अनुभवला.

ShivShardul Percussions पथकाच्या दमदार गजरात गणरायाचे आगमन झाले आणि क्षणातच Farmington High School चा परिसर मराठमोळ्या उत्साहाने भरून गेला. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्या चिमुकल्यांनी स्वतःच्या हाताने घडवलेल्या गणेशमूर्ती घेऊन बाप्पांचे स्वागत केले. त्या छोट्या हातांनी केलेली गणपतीची प्रतिष्ठापना आणि भक्तिभावाने केलेली पूजा पाहताना जाणवले की परंपरा केवळ जपली जात नाही, तर ती प्रेमाने पुढच्या पिढीच्या हातात सोपवली जाते.

बाप्पांच्या आशीर्वादाने सुरू झालेल्या या दिवसात सुग्रास भोजनाचा स्वाद सर्वांनी आनंदाने घेतला नसता तरच नवल! आपल्या घरच्या गणेशोत्सवाच्या आठवणी जागवणारा सुंदर उकडीचा मोदक, गरमागरम वरण-भात, पोळी, बटाट्याची भाजी, पंचामृत आणि सोबतीला मोदक आमटी! अतिशय सात्त्विक आणि रुचकर अशा जेवणाला सर्वांची पसंती मिळाली.

जेवणानंतर या भक्तिमय दिवसाला लाभली सुरांची सुंदर साथ — 'स्वर-रंग' या कार्यक्रमामध्ये. Austin, Texas येथून खास A2MM साठी आलेल्या गायिका Ashwini Gore-Deshpande यांनी 'ॐकार अनादी अनंत', 'मी राधिका', 'बोलावा विठ्ठल' अशा भक्तिमय गाण्यांसोबतच 'सूरत पिया की' आणि नाट्यसंगीतातील विविध पदांचे सुंदर medley अशा वैविध्यपूर्ण, अवघड आणि भावसमृद्ध गीतांची निवड केली होती. प्रत्येक गीत त्यांनी विलक्षण सहजतेने आणि तितक्याच भावपूर्णतेने सादर केले.

त्यांच्या गायनाला Giri Aigalikar यांच्या तबल्याची आणि Pranit Marathe यांच्या हार्मोनियमची सुरेल साथ लाभली. Uma Kanade यांच्या ओघवत्या आणि समर्पक निवेदनाने या मैफलीतील प्रत्येक भाव अधिक खुलवला.

संगीताची मैफल संपली आणि पुन्हा सर्वांची पावले बाप्पांच्या चरणांकडे वळली. आरती आणि विसर्जनाच्या वेळी टाळ्यांचा नाद, ओठांवरचा "मोरया"चा जयघोष आणि मनात दाटून आलेली निरोपाची भावना — या सगळ्यांनी वातावरण भारावून गेले.

बाप्पांना निरोप देताना जाणवले की हा केवळ एका दिवसाचा उत्सव नव्हता; हा होता आपली संस्कृती, आपली भाषा, आपले संगीत आणि आपलेपणाची भावना पुन्हा एकदा जगण्याचा सोहळा. परदेशातील भूमीवरही मराठीपण मनात जिवंत ठेवणाऱ्या या उत्सवाने एक गोष्ट पुन्हा अधोरेखित केली — माती कितीही दूर असली, तरी संस्कृतीची नाळ मनाशी जोडलेली असेल, तर महाराष्ट्र आपल्यापासून कधीच दूर जात नाही.


बाप्पा आले... मनं जोडून गेले... आणि जाताना पुढच्या भेटीची आस देऊन गेले.

गणपती बाप्पा मोरया!

पुढच्या वर्षी लवकर या!



New England Marathi Mandal (NEMM)













Milwaukee Maharashtra Mandal















Colorado Marathi Mandal



गणेशउत्सव सांगता

लेख

अमेरिकेतील गणेशोत्सव - सौ. शुभदा विलास सावरगावकर

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटी समप्रभ
निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येशु सर्वदा ॥

बाळ गंगाधर टिळकांनी १८९४ साली स्वातंत्र्यलढ्याच्या काळात भारतीयांना एकत्र करून स्वातंत्र्याची रणनीती बनवण्या साठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला होता. आज महाराष्ट्रात, भारतातील इतर राज्यात आणि भारताबाहेरही अनेक देशांमध्ये अगदी थाटामाटात हा उत्सव साजरा केला जातो. गणेशोत्सवाला बहुआयामी स्वरूप प्राप्त होण्याआधी प्रामुख्याने महाराष्ट्रीयन लोकं स्वतःच्या घरातच गणपती उत्सव साजरा करत असत. तशी गणपतीची उपासना महाराष्ट्रात खूप पूर्वीपासून, छत्रपती शिवाजी महाराज तसेच पेशव्यांच्या काळातही चालू होती आणि ती नंतरही चालूच राहिली. अष्टविनायक भक्ती परंपरा महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात रुजलेली आहे. गणेश पूजेला सगळ्याच विधी, महत्वाच्या समारंभांमध्ये खूप महत्त्वाचे प्रथम स्थान होते आणि अजूनही आहे; कोणतेही महत्वाचे कार्य निर्विघ्न पार पडावे म्हणून कार्यारंभी प्रथम गणपतीची आराधना होते. घरोघरी आणि सार्वजनिकरीत्या गणेशाची साग्रसंगीत पूजा करून त्याचे पावित्र्य अजूनही बऱ्याच ठिकाणी जपले जात आहे; तरीदेखील कालानुरूप त्याचे स्वरूप बदलताना ही आपल्याला दिसून येते आहे.

मराठी माणूस हा जगाच्या पाठीवर कोठेही गेला तरी सोबत आपली मराठी भाषा - संस्कृती, सण आणि चाली रीती आपल्यासोबत घेऊनच जातो. जिथे जातो तिथे तिचे जतन आणि संवर्धन करतो, आणि ती फुलवतो. महाराष्ट्राबाहेर इतर राज्यात तसेच भारताबाहेरही अनेक देशात - अमेरिकेतही प्रामुख्याने हे अनुभवायला मिळते.

या सर्व सण आणि उत्सवात गणेशोत्सव तसेच दसरा, दिवाळी, रक्षाबंधन, गुढीपाडवा, संक्रांत, 1 मे महाराष्ट्र दिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन यांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. अमेरिकेत गणेशोत्सवाची सुरुवात १९०० च्या शतकात आलेल्या मराठी माणसाच्या घराघरातून झाली. नंतर १९५० – १९६० च्या सुमारास ठिकठिकाणची स्थानिक मराठी कुटुंबे, काही मित्रमंडळी एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करायला लागले. अनेक स्थानिक महाराष्ट्र मंडळांची १९७० च्या दशकात स्थापना झाल्यावर मराठी मंडळे सार्वजनिक स्तरावर त्यांच्या सदस्यांना एकत्र आणून गणेशोत्सव साजरा करायला लागले. अमेरिकेत शिकागो महाराष्ट्र मंडळाची स्थापना १९६९ साली झाली. न्यूयॉर्क महाराष्ट्र मंडळाची स्थापना १९७० मध्ये झाली. तसेच न्यू जर्सी, मराठी विश्वची स्थापना १९७८ साली झाली. घाणेकर आजींनी न्यूजर्सी येथे गणपतीची मूर्ती स्वतःच्या हातानी बनवून घरीच गणेशोत्सव साजरा करण्यास १९७९ पासून सुरुवात केली. अनेक मराठी कुटुंबे त्या उत्सवाशी जोडली गेली आणि सर्वांच्या सहभागाने त्याला सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप आले. बे एरिआतील महाराष्ट्र मंडळाचे हे गणेशोत्सवाचे ४६ वे वर्ष आहे. तसेच फिलाडेल्फिया महाराष्ट्र मंडळ गेली २२ वर्षे केवळ मराठीच नाही तर इतर सर्व भाषिकांना एकत्र आणून अतिशय देखणा गणेशोत्सव साजरा करत आहे. जागेअभावी येथे सगळ्याच मंडळांचा उल्लेख करणे शक्य नसले तरीही अमेरिकेतील सर्वच महाराष्ट्र मंडळे अतिशय जल्लोषात आणि उत्साहात गणेशोत्सव साजरा करतात. यंदा बृहन महाराष्ट्र मंडळानेही एक अनोखा उपक्रम - उत्तर अमेरिकेतील बाप्पांची आरास - कल्पकता, परंपरा आणि भक्तीचे, सर्वांच्या घरच्या गणपतींचे फोटोज "बीएमएमबाप्पा माझा" उपक्रमाअंतर्गत पोस्ट करून सुंदर दर्शन घडवले. त्याला उदंड प्रतिसाद मिळाला.

आम्हाला अमेरिकेत स्थायिक होऊन आता ३७ वर्षे झाली. अमेरिकेतील गणेशोत्सवाचे स्वरूप बघताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे घरचे आणि सार्वजनिक; दोन्ही ठिकाणचे गणेशोत्सव अतिशय उत्सवी, नियोजन पूर्ण आणि मुख्य म्हणजे पावित्र्य जपणारे असतात. प्रचंड उत्साहाने आणि कल्पकतेने सजवलेला मंडप, अतिशय वैविध्यपूर्ण आरास, गणपतीची सुरेख रेखीव मूर्ती, ढोल ताश्याच्या गजरात आणि लेझीमच्या जल्लोशात काढलेली गणपतीची मिरवणूक आणि विधिवत प्रतिष्ठापना, प्रचंड उत्साहात आणि जल्लोषात होणाऱ्या आरत्या, मोदकाचा प्रसाद अगदी सर्व सुग्रास मराठी जेवण, सुनियोजित कार्यक्रम आणि विसर्जन असे त्याचे साधारणपणे स्वरूप असते. महाराष्ट्र मंडळाच्या गणपतीत अतिशय उत्तमोत्तम कार्यक्रम – नृत्याविष्कार, नाट्याविष्कार, भारतातले नावाजलेले कलाकार, प्रसिद्ध गायकांचे गाण्याचे कार्यक्रम, गाजलेली नाटके असे उत्तमोत्तम कार्यक्रम आयोजित केले ज़ातात. शेकडो स्वयंसेवक हे गणेशोत्सवाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी रात्रंदिवस झटून काम करतात.

तसेच मराठी, महाराष्ट्रीयन कुटुंबांमध्ये घरोघरी दीड दिवस, पाच दिवस (गौरीसोबत) किंवा दहा दिवसांचा गणपती अतिशय उत्साहाने साजरा होतो. आमच्या घरीदेखील गेली २८ वर्षे १२५ - १५०+ मित्रमंडळींच्या उपस्थितीत दरवर्षी दणक्यात गणेशोत्सव साजरा होतो. अनेक अमेरिकन मित्र-मैत्रिणीही गणपतीचे आशीर्वाद घेण्यासाठी दरवर्षी आवर्जून येतात आणि गणपती पूजेबद्दल खास जाणून घेतात. आता तर आम्ही जिथे राहतो त्या आमच्या हाऊसिंग डेव्हलपमेंटमध्येही गेल्या पाच वर्षांपासून गणपतीची एक दिवसासाठी स्थापना केली जाते - आणि त्यात केवळ मराठीच नाही तर गुजराथी, साऊथ इंडियन - तेलुगू आणि तमिळ, कर्नाटक, पंजाबी - . सर्वच भाषिक; १२५+ लोकं अतिशय उत्साहाने सहभाग घेतात.

आता तर बृहन्महाराष्ट्र मंडळ सारख्या संस्था, आणि महाराष्ट्र मंडळे - इतर संस्थाही लहान मुलांसाठी गणपती बनवायचे वर्कशॉप ही घेतात. अथर्वशीर्षाचे पठण हा कार्यक्रमही काही मंडळे, ग्रुप्स राबवतात. हल्ली इंडियन ग्रोसरी स्टोर्समध्ये पर्यावरणपूरक गणपतीच्या छान सुबक मूर्ती आणि सगळे पूजा साहित्य मिळते. आणि हो, चितळे आणि बेडेकर यांचे उत्तम प्रतीचे मोदक देखील आता अमेरिकेत उपलब्ध आहेत; ज्यांना मोदक बनवणे जमत नसेल किंवा तेव्हढा वेळ नसेल त्यांच्यासाठी!

महाराष्ट्र आणि भारताबाहेर, आपली संस्कृती आणि परंपरा ही खूप चांगल्या रीतीने महाराष्ट्रियन लोकांनी जपून ठेवून त्याचे संवर्धन केलेले आहे. गणेशोत्सवासारखे सण घरी तसेच सार्वजनिकरीत्या साजरे केल्याने मुलांवर नकळतपणे चांगले संस्कार होतात. त्यांना आपली संस्कृती आणि परंपरा यांची लहानपणापासूनच ओळख होते आणि ती पुढेही कायम राहते. लहान मुलांपासून ते सिनियर सिटिझन्स पर्यंत सर्वचजण ह्यात अतिशय उत्साहाने सहभागी होतात, तेही पारंपरिक - ठेवणीच्या मराठमोळ्या पेहरावात. महाराष्ट्र मंडळांच्या गणेशोत्सवासारख्या कार्यक्रमांमधून सामाजिक बाधिलकीच्या जाणीवेतून समाजसेवी संस्थांसाठी निधी संकलन करून दिला जातो. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात पूरग्रस्त, भूकंपग्रस्त अशांसाठी देखील निधी गोळा करून पाठवला जातो.

बाप्पाला निरोप देताना, विसर्जन करताना साहजिकच सर्वचजण खूप भावुक होतात!

गणपती बाप्पा मोरया. पुढच्या वर्षी लवकर या!

गणपती गेले गावाला. चैन पडेना आम्हाला!

अशीच भावविभोर स्थिती प्रत्येकाचीच होते आणि पुन्हा.. न नकळत अमेरिकेत देखील आपण सर्वजण भारत - महाराष्ट्रातल्या सारखीच पुढच्या वर्षी बाप्पाच्या पुनरागमनाची वाट बघायला लागतो!

सौ. शुभदा विलास सावरगावकर



सर्वोत्कृष्ठ २०

आमच्यासाठी सहभागी झालेलं प्रत्येक कुटुंब विजेतंच आहे.
प्रत्येक आरासामागची भावना, मेहनत आणि बाप्पावरील प्रेम हेच या उपक्रमाचं खरं यश आहे.

सर्वोत्कृष्ट २०



Samir Sathe

सर्वोत्कृष्ट २०



Sudnesh Bhokare

सर्वोत्कृष्ट २०



Rakesh Kolapkar, Canada

सर्वोत्कृष्ट २०



Shital Arjunsing Patil

सर्वोत्कृष्ट २०



Apeksha Labde

सर्वोत्कृष्ट २०



Varsha Patil

सर्वोत्कृष्ट २०



Swapnasheela Khandagale

सर्वोत्कृष्ट २०



Sunil Deshpande

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Manjiri Khare

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Prajakta Badgujar

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Dimple Chaudhari

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Amruta Paricharak

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Vaishali Choure

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Damini Bhosale

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

Abhijit Patil

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Manjiri Khare

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Abhiruchi Shinde

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Kavita Mali

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Shraddha Jagtap

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

सर्वोत्कृष्ट २०



Jyotsna Maid

सर्वोत्कृष्ट २०

गणेश सजावट स्पर्धा २०२६

आमच्याशी जोडलेले राहा!

@BMM.NorthAmerica

Instagram

Scan QR code from Mobile

WhatsApp Channel

Scan QR code from Mobile

Facebook Group

Scan QR code from Mobile

वेबसाइट · Website

Scan QR code from Mobile